# पेत्राचे पहिलें पत्र

1 Peter | with Study Notes

# पेत्राचे पहिलें पत्र

## 1

[1] पेत्रातर्फे जो येशू ख्रिस्तांचा प्रेषित[*] आहे, त्या परदेशीयांच्या[*][*] नांवे जे पंत, गलतिया, कपदुकीया, आशिया व बिथुनिया[*] यांत
परदेशीय आहेत. [2] परमेश्वर तुम्हांला बहुत पूर्वीपासूनच ओळखीत होता[*][*] व त्याने तुम्हांला दुसऱ्या लोकांपासून आत्म्याद्वारे राखलेले
व वेगळे केलेले[*] आहे. म्हणूनच तर, तुम्ही त्याची आज्ञा पाळली[*] व येशू मशीहांच्या रक्ताने तुम्ही शुद्ध केलेले[*] आहातच. परमेश्वराची
विपुल कृपा[*] व शांति तुम्हांस मिळावी. [3] आमच्या प्रभु येशू मशीहांचे परमेश्वर व बाप याचा धन्यवाद व्हावा, ज्याने येशू मशीहांच्या
मेलेल्यांतून जिवंत उठण्याद्वारे[*], आपल्या महान दयेने आम्हांला जिवंत आशेत[*] नवा जन्म[*] दिलेला आहे; [4] अर्थात एक न मिटणारे

---

[*] **1:1** *"प्रेषित"*- मत्त 10:2

[*] *"परदेशीय"*- 2:11; इब्री 11:9,13.येशूंचे विश्वासी या दुनियेत (पृथ्वीवर) असलेल्या त्यांच्या घरांचे नाहीयेत, परंतु, वास्तविक पाहता त्यांची खरी नागरिकता स्वर्गाची आहे - फिलि 3:20.

[*] *"परदेशीयांच्या"*- पेत्र या ठिकाणी एक पारिभाषिक (टेकनिकल) शब्द जो ग्रीक भाषेत "डायस्पोरा" असा आहे, तो उपयोगात आणून स्पष्ट करतो की परदेशीय म्हणजे ते यहूदी लोक जे पलिष्टयांच्या देशाबाहेर (इतरत्र) राहत होते - योहान 7:35ज्यांना पेत्र लिहित होता, ते लोक येशू ख्रिस्तांचे शिष्य झाले होते. पेत्र हा यहूदी लोकांसाठीचा प्रेषित होता - गल 2:7,8आणि त्याच्या दोन पत्रांत तो यहूदी ख्रिस्तींना काही आदेश-निर्देश देतो (पाठवितो) आहे. असे वाटते की त्यांपैकी काहींनी, पेंटेकाॅस्टच्या दिवशी (बहुतेक) त्याने दिलेला संदेश (येशूवार्ता) ऐकिलेला असावा - प्रेषि 2:9.

[*] *"पंत...बिथुनिया"*- आज ज्यास "तुर्कस्तान-टर्की" म्हणतात, त्या क्षेत्रातच हे सर्व प्रांत स्थित होते.

[*] **1:2** *"बहुत...होता"*- मत्त 24:22,24,31; योहान 17:6; इफि 1:4.

[*] *"राखलेले - वेगळे केलेले"*- नोट्स - योहान 17:17-19.पाहा वचन - लेवी 20:7.परमेश्वराचा आत्मा विश्वासींना दुनियेच्या (तील) सर्व लोकांपासून अगदी वेगळे ठेवतो. तो त्यांना अपराधांविषयी जाणीव करून देतो, त्यांना पश्चात्तापापर्यंत घेऊन येतो, आणि एक नवीन आत्मिक जीवन देतो, परमेश्वराचा आत्मा सत्याविषयी सुद्धा शिकवतो - योहान 3:5-8; 16:7-15.

[*] *"लोकांपासून...केलेले"*- नोट्स - रोम 8:29व रोमच्या पत्रांतील शेवटचे नोट्स. लक्षपूर्वक या वचनात त्रिएकत्वाच्या तीन व्यक्तींकडे पाहा - नोट्स मत्त 3:16-17.येथे विश्वासींच्या उद्धाराविषयी अनेक महत्वाच्या बाबींचा उलगडा केला आहे. आपण त्याविषयीचे कारण व त्याचा प्रारंभ पाहातो - अर्थात परमेश्वराची निवड. त्याची पद्धत व प्रक्रिया पाहातो - आत्म्याचे कार्य, त्याचा हेतू व लक्ष्य (निशाण) पाहावयास मिळते - अर्थात येशू ख्रिस्तांचे आज्ञापालन, आपण त्याचा माध्यम व आधार पाहातो अर्थात येशूंचे रक्त. तुल - 2 थेस्स 2:13-14.

[*] *"आज्ञा पाळली"*- "वेगळे केलेले"- परमेश्वराने आपल्याला जे बोलाविलेले आहे, त्यांत आत्म्याचे जे कार्य आहे, त्याचा हेतू एकच होय, अर्थात ख्रिस्तांप्रत आपणांस आज्ञाधारक करणे - नोट्स - प्रेषि 22:10.बारीक लक्ष द्या येशूंच्या रक्ताने, सिंचन होऊन शुद्ध केले जाण्याआधी वचनाच्या पहिल्या भागात त्याविषयी लिहिलेले आहे. पाहा, आपण त्यांचा प्रभु व उद्धारकर्ता म्हणून स्वीकार केल्यामुळेच (त्यानंतरच) येशूंच्या रक्ताद्वारे शुद्ध व पवित्र म्हणवून वेगळे केले जातो. हे झाल्यानंतर मग परमेश्वराची इच्छा आपल्याप्रत अशीच असते की अख्ख्या जीवनभर (आमरण) आपण त्याची 'प्रेमासह-आज्ञा' पाळत राहावी - योहान 14:15-23; रोम 1:5.

[*] *"शुद्ध (सिंचन) केलेले"*- जुन्या (बायबलचा पहिला भाग) करारात जनावरांचे रक्त शिंपडले जाई आणि त्याद्वारे चार ठळक-महत्वाच्या गोष्टी पूर्ण होत असत: 1. शुद्ध (वेगळे) केले जाणे - लेवी 14:1-7. 2. याजक वेगळे केले जाणे - निर्ग 24:1-8. 3. परमेश्वराच्या कराराची पुष्टि (भक्कम-निश्चिती/पक्के) - निर्ग 24:1-8. 4. प्रायश्चित्त किंवा अपराधक्षालन - लेवी 16:14. प्रभु येशू ख्रिस्तांच्या रक्ताद्वारे विश्वासी क्षमा मिळविलेले व त्यांच्या अपराधांपासून स्वच्छ (साफ) केलेले आहेत - इफि 1:7; इब्री 9:14; 1 योहान 1:7,याजक म्हणून त्यांना परमेश्वराच्या उपस्थितीत सादर (हजर) होण्यास पूर्णपूर्ण 'मुभेसह पोच' (प्रवेश हक्क) उपलब्ध झाली आहे - इब्री 10:19-22आणि त्यांना नवीन कराराचे भागीदार केले गेले आहे - मत्त 26:28; इब्री 1:3.

[*] *"कृपा"*- तीताला 3:5; इफि 2:4.

[*] **1:3** *"जिवंत उठण्याद्वारे"*- मत्त 28:6; प्रेषि 1:3; 2:24; रोम 1:4; 1 करिं 15:12-19.जर ख्रिस्त मेलेल्यांतून जिवंत उठलेच नसते, तर कोणालाही कधीही उद्धाराची आशा राहिली नसती.

अविनाशी आणि अमर वतन[*][*] (विरासत), जे तुमच्यासाठी स्वर्गांत राखून ठेवलेले आहे. [5] जी मुक्ति येणाऱ्या समयांत भविष्यकाळी प्रगट होणार आहे[*], त्या उद्धारासाठी परमेश्वरी ताकदीने विश्वासीं विश्वासाद्वारे[*] सुरक्षित राखून ठेवलेले आहेत. [6] याच कारणामुळे तुम्ही मग्न राहता, जरी या समयी[*] (आवश्यक आहे की) तुम्ही नाना प्रकारच्या परीक्षांमुळे (समस्या) उदास आहा तरीही. [7] [*]ते

---

[*] *"जिवंत आशेंत"*- रोम 5:2; 8:24-25; तीताला 1:2. "आशा" या शब्दाचा अर्थ येथे "अपेक्षा" - याअर्थी आहे.

[*] *"नवा जन्म"*- योहान 1:13; 3:3-8; इफि 2:5; याकोब 1:18; 1 योहान 3:9; 4:7; 5:1.

[*]**1:4** *"अमर वतन"*- मत्त 25:34; प्रेषि 20:32; इफि 1:14; कल 1:12; इब्री 1:14; 6:12; याकोब 2:5.फक्त नी फक्त, नवीन आत्मिक जीवनाद्वारे जे लोक परमेश्वराची लेकरें (बाळकें) आहेत, त्यांच्यासाठीचेच हे अमर वतन राखीव ठेवलेले आहे. जे लोक या दुनियेशी असलेले संबंध "यापुढे आता नको"या विश्वासाने खास येशूंसाठी त्यागून देतात, त्यांना स्वर्गाचे अर्थात वरच्या दुनियेचे वतन, वारसा - हक्काद्वारे मिळेल (होईल) - मत्त 19:27-29.प्रियांनो, सर्वप्रथम सांगायचे झाले तर ही अमर - अविनाशी विरासत म्हणजे परमेश्वर स्वत:च आहे - उत्प 15:1; स्तो 16:5; 73:25-26; विलाप 3:24;त्या पश्चात परमेश्वर इतर सर्व गोष्टी देण्याची निवड करतो - प्रकटी 21:7.

[*] *"एक न मिटणारे...वतन"*- हे अमर वतन या सृष्टीची एक निर्मिती नाहिये, म्हणजे असे जे नाश होणारे आहे - 1 करिं 15:50,53,परंतु, असे आहे ज्याचा नाश कधीही होणे नाही व जे अनंत आहे. "तुमच्यासाठी...आहे"- बाहेरचा कोणी येईल, घर फोडील व चोरी करून नेईल असा याविषयीचा धोकाच नाहीये. परमेश्वराने ते विश्वासींसाठी 'राखीव' करून जपून ठेविलेले आहे, परमेश्वराच्या सुरक्षेतून व हातून ते कोणीही हिसकूही शकत नाही. ज्यांचा असा विश्वास आहे की त्यांचे अमर वतन स्वर्गात आहे, त्यांनी या पृथ्वीवरील प्रत्येक वस्तु ज्या त्यांना मिळविता येतात त्या प्राप्त करून घेण्याची धडपड करू (किबंहुना करणार नाही) नये.

[*]**1:5** *"मुक्ति... होणार आहे"*- परमेश्वर विश्वासींचे रक्षण (विश्वासाचे) तोवर करीत नाही, ज्या वेळी ते काही कारणाने अपराध करतात वा एखाद्या शंकेची पाल त्यांच्या मनांत चुकचुकते, परंतु, तो विश्वासंूच्या उद्धाराच्या पूर्णतेपर्यंत म्हणजे, विश्वास पूर्णत: सिद्ध होऊन ते विश्वासाने तुडूंब होत नाहीत, तोवर त्यांच्यासह असतो. पाहा, पेत्र येथे उद्धाराच्या भविष्याच्या पैलूविषयी (शीसंबंधीत) बोलतो आहे. विश्वासी अगोदरच तारलेले आहेत - योहान 5:24; रोम 8:24; इफि 2:5; 2 तीम 1:9; तीताला 3:5.आणि त्यांच्या विश्वास-रक्षणाची ही प्रक्रिया सतत कायम राहाते - 1 करिं 1:18; 2 करिं 6:10; 8:2; गल 5:22; 1 थेस्स 1:6."याच कारणामुळे" या शब्दाकडे नीट लक्ष द्या. हे शब्द जे काही तो वचन यांत बोलला त्याकडे संकेत करतात. पेत्र म्हणतो की 'आनंदमय-मग्नता' चार बाबींमुळे येते. 1. नवा जन्म. 2. एक जिवंत आशा 3. भविष्यकाळी स्वर्गात मिळणाऱ्या अमर वतनाविषयीचे (विरासतीचे) ज्ञान. 4. आपल्याला राखून ठेवणारी परमेश्वराची ताकद व त्याची निश्चिती (आश्वासन).

[*] *"विश्वासाद्वारे"*- ग्रीक शब्दाचा "राखून" हा मिलिट्रीचा शब्द आहे, ज्याचा अर्थ 'पाहाऱ्यात सुरक्षित'असा आहे. परमेश्वराचे सामर्थ्य ते सुरक्षित ठेवते. परमेश्वर सर्व सुरक्षाव्यवस्थेचा पोशिंदा आहे, स्वर्गातील सगळया सेना त्याच्या आधीन व आज्ञेत (ताबा) आहेत, तो आपले स्वर्गदूत आज्ञा देऊन, विश्वासींच्या सेवे-साहाय्याकरता पाठवितो - इब्री 1:14; स्तो 91:11-12.तो या जगातील व अदृश्य आतंरिक जगातील विश्वासींच्या सुरक्षेसाठी, शेवटपर्यंत त्यांचे संरक्षण व त्यांची मदत करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व व्यवस्था (सुरक्षा-प्रबंध) करत असतो - योहान 6:39; 10:28-29.हे असे केवळ त्याचा पुत्र येशू यांच्या प्रार्थनेच्या उत्तरांच्या रूपांत शक्य (घडत) होते - योहान 17:11-12; रोम 5:9-10; इब्री 7:25.पण समजा जर विश्वासी, विश्वास ठेवणे थांबवितात तर ते त्यांचा उद्धार गमावणार नाहीत काय? प्रियांनों पाहा, परमेश्वर त्यांचे 'सुरक्षा कवच' होतो आणि कोणत्याही प्रकारच्या धोक्यापासून 'विश्वासाद्वारे' त्यांचे रक्षण करतो विश्वास हे परमेश्वराची वरदान (बक्षिस) आहे - इफि 2:8; फिलि 1:29.विश्वास जणू काही, त्याच्या हातात असलेले एक साधन आहे जे सतत आपले सजीव संपर्क त्याच्याबरोबर साधते व त्याच्याशी जोडून ठेवते. विश्वास एक प्रचंड सामर्थी बळ आहे जे परमेश्वराने आपल्या जीवनात आणले आहे. विश्वास एक सिद्ध-संपूर्ण वरदान आहे. जे कार्य आपल्या जीवनात करण्याची योजना परमेश्वराने आखली होती त्या कार्यात 'अचूकपणे' फिट (बसणे) होण्याकरता 'स्वयंसिद्ध' व अगदी समर्पक आहे. तो जो थोर परमेश्वर 'विश्वासदाता' आहे, तोच त्याने दिलेला विश्वास, विश्वासींच्या हृदयात सजीव (जिवंत) ठेवण्यास समर्थ आहे - लूक 22:31-32.आपण विश्वास सांभाळला किंवा डगमगलो (डळमळीत-विश्वास) तरी तो विश्वसनीय राहातो - फिलि 1:6; इब्री 12:2;जरी कधी (असे होतेच) आपला विश्वास थोडया समयाकरता डळमळला व आपण ठेचाळलो, तेव्हा तो आपल्या विश्वासाचे नवीनीकरण करतो.

[*]**1:6** *"जरी या समयी"*- कधी कधी असे काही अनुभव येतात जे आपल्या हृदयातील आनंद- प्रवाह (धारा) अडवितात (बाधक). अपराध ही एक बाधा असते - स्तो 32:3-5; 51:3-4,8,12.शंका ही दुसरी बाब असते - मत्त 14:29-31; लूक 24:37-38; याकोब

अशासाठीच, की तुमचा ‘पारखलेला*-विश्वास’ जो अग्नीने तापविलेल्या नाश न होणाऱ्या सोन्यांहून देखील कितीतरी अधिक पटीने
मूल्यवान (किमती) आहे, (तो) येशू ख्रिस्तांच्या आगमनाच्या वेळी (परत येणे) प्रशंसा, सन्मान (आदर) व महिमेचे कारण ठरावा.
8 न पाहता*, तुम्ही येशूंवर प्रेम* करिता आणि दिसत नाही तरी पाहिल्याविनाच विश्वास करून असे आनंदित* होता व रमून (मग्न)
जाता, जे अवर्णनीय* (वाखाणण्यापलीकडचे) आहे व महिमेने देखील पुरेपूर (भरलेले) आहे, 9 आणि तुमच्या विश्वासाचा परिणाम
तुमचा उध्दार* आहे. 10 याच मुक्तीविषयी त्या संदेष्टयांनी* हुशारीने बारीक तपासणी केलेली होती. 11 *त्यांनी याविषयी सविस्तर

---

1:6.पुढे एखाद्या चुकीच्या शिकवणीत अडकणे - गल 3:1-3; 4:15-17.त्यानंतर ज्या परीक्षा व समस्या येतात व आपली पारख होत असते, त्यामुळे देखील हा आनंदाचा धाराप्रवाह थांबू शकतो - गल 3:1-3; 4:15-17;पण असे होणारच असेही नाही. एक सबळ व सकारात्मक विश्वास, भीषण व कठोर संकटांमध्ये होणाऱ्या पारख-प्रक्रियांतून देखील आनंदित होऊ शकतो, त्यास तोंड देऊ शकतो - प्रेषि 5:41; 2 करिं 12:7-10; कल 1:24; याकोब 1:2.म्हणून असे सिद्ध होते की एकाच समयी, विश्वासी 'उदासी-निराशा' व 'अलौकिक आनंद' या दोन्हींचा अनुभव घेऊ शकतो - 2 करिं 6:8-10.बारीक लक्ष द्या की परीक्षा, पारख, संकटे व निराशा ही सर्व “फार थोडक्या वेळेसाठी- 2 करिं 4:17आहेत.

***1:7** सोनार अग्नीने तापविलेल्या भट्टीत शुद्ध करण्यासाठी सोने ओतत असतो, शुद्धीकरणासाठी तो तापलेला अग्नी वापरतो. त्याचप्रमाणे परमेश्वर विश्वासींची पारख व्हावी म्हणून त्याना तप्त-अग्निरूपी-परीक्षेची परवानगी देतो - तुल स्तो 66:10-12.पाहा, विश्वास हा सोन्यांहून सुद्धा प्रचंड बहुमोल आहे. तर मग लोक विश्वासाकडे दुर्लक्ष करून सोन्यामागे व दुनियेच्या दौलतीमागे, वेडयांसारखे लागलेले असतात ही अतिशय दुःखाची गोष्ट आहे की नाही? 'विश्वास' असा प्रचंड मोल्यवान आहेच कारण त्याच्याठायी स्वर्गाचे अनंतकालीन धन आहे म्हणून तो अनंत-असीमित खजिना विश्वासीला मिळवून देतो.

**“पारखलेला”*- ग्रीकमध्ये जो ‘पारखणे’ शब्द जो वचन 6 यांत आहे, त्याहून येथे वापरलेला ग्रीक शब्द अगदी वेगळया अर्थाचा आहे. विश्वासाचे पारखले जाणे प्रगट करते की आपला विश्वास खरोखरीच आहे, वा फक्त विचार आहे किंवा आपण तोंडाने फक्त उच्चारितो की आपला विश्वास आहे. भीषण, गंभीर संकटांच्या अग्नितून जातांना देखील जेव्हा आपण विश्वासात दृढ राहातो, दुनियेच्या दिशेने पुन्हा वळत नाही, तेव्हा फक्त तेव्हाच सबळ-सशक्त प्रमाण स्पष्ट होते व सिद्ध करते, की 'आपला विश्वास सच्च्या सोन्यासारखा' शुद्ध-अढळ आहे - तुल मत्त 13:21,23; इब्री 10:32,39.

***1:8** *“न पाहता”*- प्रेम करणे, विश्वास करणे 'न पाहाता' हे शक्य आहे काय! विशेषत: ज्याला आपण कधी पाहिलेच नाही, त्यावर विश्वास ठेवणे संभव आहे? होय खात्रीने. आपल्याजवळ ख्रिस्तांचे वचन (शब्द) आहे, त्यांचा आत्मा आहे, जो विश्वासींसाठी ख्रिस्तांची उपस्थिती खरीखुरी व वास्तविक करतो, ती जाणवून देतो.

**“प्रेम”*- योहान 14:15; 21:16; 1 करिं 13:7; 16:22; गल 5:6 -येथे आणखी एक प्रमाण, व उदाहरण आहे की विश्वास हा मनापासून विश्वसनीय सरळ व प्रामाणिक आहे. सच्चा विश्वास व प्रेम ही दोन्ही फक्त येशूंसाठीच असतात. याचे प्रमाण म्हणजे येशूंसाठी हरेक समयी हातांत हात घालून त्यांचे एकत्र चालत राहाणे हेच होय. जर आपल्यात यांतील एक नाहीये, तर साहाजिकच दुसरे सुद्धा नाहीच नाही.

**“आनंदित”*- वचन 6, नहेम्या 8:10; स्तो 4:7; 16:11; 21:6; 28:7; 43:4; 81:1; यश 12:3; 35:6,10; लूक 2:10; योहान 16:20-24.

**“अवर्णनीय”*- 'वाखाणण्यापलीकडचे'

***1:9** *“उद्धार”*- वचन 5. आपल्या परीक्षेच्या समयांमध्ये आजही, आताही विश्वासी तारणाचा अनुभव घेत आहेत, यापेक्षा सुद्धा विपुल अनुभव जो 'स्वयंपूर्ण'आहे, तो ते यानंतर भविष्यकाळी अनुभवणार (प्रत्यय येणे) आहेत.

***1:10** *“संदेष्टयांनी”*- पेत्र जुन्या करारातील संदेष्टयांचा येथे उल्लेख करतो - नोट्स उत्प 20:7.आज जी कृपा जागतिक विश्वासींना उपलबध झाली आहे, त्याविषयी त्यांनी त्या काळी लिहून ठेविलेले होते. त्यांच्या माहितीत भविष्यवाण्या, चित्र, प्रकार आणि येशूंची छाया व जे तारण येशू घेऊन आले, त्यांचा समावेश आहे - लूक 4:17-21; 24:25-27,45-47; योहान 5:39,46; इब्री 8:5; 10:1.

***1:11** - जुन्या करारातील संदेष्टयांत येशूंचा आत्मा होता, आत्म्याने जसे प्रकाशन दिले, ते (त्यांना) पूर्ण समजत नसतांही त्यांनी भविष्यवाणीचे शब्द लिहून ठेवले. मग पुढे त्यांनी जे काही लिहिले होते, त्याविषयीची बारीक तपासणी व सविस्तर शोध करण्याचा व ते समजण्याचा प्रयत्न देखील केला. प्रियांनों, एका गोष्टीकडे लक्ष द्या, ख्रिस्त या दुनियेत येण्यापूर्वीही (च) त्यांचा आत्मा या पृथ्वीच्या पाठीवर वावरत होताच. आत्म्याने येशूंच्या दुःखाविषयी व महिमेविषयी आधीच अंदाज (भविष्य) देऊन ठेविलेला होता - उदा - तुल स्तो 22:1-21 यांत दुःखसहनासंबंधी वचनें 22-31 यांत महिमेविषयी तेच सत्य- यश अध्या. 53, वचनें 1-9 यांत दुःख पीडा व वचनें 10-12 यांत गौरव यश 52:13-15यांत दुःख व गौरव दोन्हीं आढळतात व गौरवाविषयी अध्या. 54 वाचा.

शोध केला, की मशीहांचा आत्मा जो त्यांच्यामध्ये होता व पूर्वीपासूनच ख्रिस्तांच्या दुःखाविषयीची व त्यानंतर येणाऱ्या महिमेची साक्ष देत असे, तो कोणत्या व कशा समयांकडे इशारा करत होता. [12] *संदेष्टच्यांवर ही गोष्ट प्रगट (ठाऊक) केलेली होती, की ते त्यांच्या (स्वतःची) नव्हे, परंतु तुमच्या सेवेसाठीच या गोष्टी सांगीत असत, त्याच गोष्टींची खबरबात आत्ता, तुम्हांला त्यांच्यापासून (कडून) मिळाली ज्याने स्वर्गातून पाठविलेल्या पवित्र आत्म्याच्या साहाय्याने तुम्हां सर्वांना आनंदाची खबर ऐकविली (कळविली). स्वर्गदूत* देखील या गोष्टी लक्षपूर्वक न्याहाळण्याची इच्छा बाळगतात. [13] *यास्तव आपली मनें*, कार्य करण्याकरिता तयार ठेवून सचेत-सतर्क* राहून येशू ख्रिस्तांच्या पुन्हा होणाऱ्या आगमन-समयी, मिळणाऱ्या कृपेप्रत पूर्ण आशा बाळगा* . [14] आपल्या अज्ञानाच्या* (समज नसणे) समयी असलेल्या जुन्या लालसांची (चाह) आवड ठेवूं नका*, अर्थात आज्ञा न पाळणाऱ्या मुलांसारखे होऊ नका*. [15] *पण तुम्हांला बोलविणारा (पाचारण) जसा पवित्र आहे, तसेच तुम्ही सर्व आचरणात (वर्तन) सुद्धा पवित्र व्हा*. [16] लिहिलेले आहे की, 'पवित्र (येशूंसारखे) व्हा, कारण मी पवित्र आहे.' [17] कारण तुम्ही हे ‘बापा-पित्या*’ म्हणून त्याच्याशी प्रार्थना (हाक) करिता जो कोणत्याही पक्षपातांवांचून (निष्पक्षपाती*) हरेक मनुष्याचे कार्य पाहून त्यानुसार न्याय करितो, म्हणून तुमच्या परदेशी असण्याचा काळ* (वेळ) तुम्ही परमेश्वराच्या भयांत* व्यतित (वागणे) करा. [18] कारण तुम्हांला ठाऊक आहे, की तुमची

---

***1:12*** - परमेश्वराने संदेष्टच्यांवर ही गोष्ट प्रगट केली होती की त्याचे शब्द (भविष्यवाणी) नंतर पुढे, पूर्णत्वास येतील, आणि हे सुद्धा संदेष्टच्यांना सांगितले की याद्वारे ते, पुढच्या पिढीची सेवा करीत आहेत. जुना करार ख्रिस्ती विश्वासींना निर्देश देण्यासाठीचा आहे - रोम 15:4; 1 करिं 10:11.आज जी येशूवार्ता प्रचारक गाजवीत आहेत, तिच्याविषयीच संदेष्टच्यांनी सांगितले होते - अर्थात, मरण, पुनरुत्थान व ख्रिस्तांचा गौरव होऊन ते उंच केले जाण्याविषयीची. जो पवित्र आत्मा स्वर्गातून खाली दुनियेत (पृथ्वीवर) पाठविला गेला होता, त्यानेच प्रेरित होऊन प्रचारकांनी संदेश द्यावा - योहान 14:16-17; लूक 24:49; प्रेषि 1:4-5,8; 2:1-4.

*“*स्वर्गदूत*”*- नोट्स - उत्प 16:7.असे वाटते की त्यांना समजत नाही की परमेश्वर ख्रिस्तांद्वारे व त्यांच्या आत्म्याद्वारे विश्वासींच्या मुक्तिसाठी काय-काय करतो आहे! परमेश्वर आत्ता त्यांना शिकवीत आहे - इफि 3:10.परमेश्वराचे गूढ इतके थोर व महत्वाचे आहे की स्वर्गदूत लक्षपूर्वक ते न्याहाळण्याची व सर्व काही जाणून घेण्याची तीव्र इच्छा बाळगतात.

***1:13*** - स्वर्गदूत तारणाची ही महान-येशूवार्ता ऐकावयास उत्सुक आहेत. मग आपण ज्यांना ही येशूवार्ता दिलेली आहे त्याविषयी अधिक जाणून घेण्याची लालसा बाळगू नये काय? आपल्यात नवीन मन आहे (देऊ केलेले) - रोम 12:2; इफि 4:23-24म्हणूनच ते नवे मन, आपण परमेश्वराच्या वचनांनी भरून टाकावे. ख्रिस्ती जीवन खालील बाबींची मागणी करते: विचार करण्याचे प्रयत्न, मनन-चिंतन - अध्ययन आणि परमेश्वराने जे आधीच प्रगट केले आहे त्याचा लक्षपूर्वक अभ्यास करून ते नीटसे समजून घेणे - तुल स्तो 1:2; 119:26-27,34,73; इफि 1:18; 3:18; फिलि 1:2-10; कल 1:9.

*“*मनें*”*- लांबसे वस्त्र कमरेत गुंडाळणे यांवरून शब्दश: असाच संकेत होतो की कृतीसाठी तयारी चाललेली आहे. विश्वासींनी मानसिक क्रियेसाठी तयार राहावयाचे आहे.

*“*सचेत-सतर्क*”*- अलंकारिक - ग्रीक शब्दाचा अर्थ: 'आत्मनियंत्रण - आत्मसंयम,' किंवा 'शांत-विवेकी,'- 'कृपेप्रत'- परमेश्वराने आधीच विश्वासींना ती दिलेली आहे, परंतु, अजूनही अधिक प्रमाणांत येणे बाकी आहे - वचन 4; इफि 2:7.अशी आशा असणे जी हरेक त्रास, दु:ख, छळ आनंदाने सहन करण्यास समर्थ असते, पारख होतांना सुद्धा जी खुश असते.

*“*ख्रिस्तांच्या...बाळगा*”*- वचन 7; मत्त 24:30; तीताला 2:13; इब्री 9:28.

*“*अज्ञानाच्या*”*- योहान 15:21; प्रेषि 3:17; 17:30; 1 करिं 15:34; इफि 4:18; 1 तीम 1:13.

*“*लालसांची...नका*”*- किंवा “दुष्टाईपूर्ण अभिलाषा”- मत्त 15:19; रोम 1:24; 8:5; इफि 2:1-3; उत्प 8:21.

***1:14*** *“आज्ञा...नका”*- वचन 2. परमेश्वराला तेच हवे आहे - वचन 2; रोम 6:17-18; 2 करिं 2:9; 2 थेस्स 2:8.

***1:15-16*** - लेवी 20:7; यश 6:3; योहान 17:17-19; रोम 6:19,22; 2 करिं 7:1; इफि 4:24; इब्री 12:10,14.प्रत्येक विश्वासीचा हेतू असाच असावा.

*“*तुम्ही...व्हा*”*- आपले जीवन दुनियावी व पवित्र (पवित्र-अपवित्र) असे विभागू नये. येशूंच्या विश्वासींचे सबंध जीवनपर्यंतचे (आमरण) वर्तन पवित्र असावे, हीच गंभीर अपेक्षा आहे.

***1:17*** *“बापा-पित्या”*- नोट्स - मत्त 5:16.

*“*निष्पक्षपाती*”*- रोम 12:11; इफि 6:9; कल 3:25.

*“*परदेशी...काळ*”*- वचन 1. ग्रीक शब्द - विदेशी जे आपल्या स्वत:च्या घरांपासून देशापासून दूर इतरत्र राहतात.

*“*परमेश्वराच्या भयांत*”*- नोट्स - 2:17; उत्प 20:11; ईयोब 28:28; स्तो 34:11-14; 86:11; 90:7-11; 111:10; नीति 1:7; प्रकटी 14:7; 15:4; 19:5.एका सत्य परमेश्वराचा पवित्र भय व आदराने, भयचकित करणारा भन्नाट सन्मान, परमेश्वराचा विरोध किंवा

निरर्थक वागणूक (आचरण-वर्तन), जी पूर्वजांपासून चालत आलेली आहे, त्यांपासून तुमची आजादी* (स्वातंत्र्य), चांदी, सोने किंवा नाश (बर्बाद) होणाऱ्या वस्तूंनी झालेली नाहीये; [19] *परंतु निर्दोष व निष्कलंक* कोंकरा* अर्थात मशीहांच्या रक्ताने तुम्हांला मिळालेली (झाली) आहे. [20] *परमेश्वराचे ज्ञान तर, दुनियेच्या निर्मितीच्या आधीपासूनच माहित झाले होते, पण आत्ता या शेवटच्या काळांत तुमच्यासाठी समोर प्रगट केलेले आहे. [21] तुम्ही ख्रिस्तांद्वारे* त्या परमेश्वरावर भरवंसा ठेवला आहे, ज्याने येशूंना मेलेल्यांतून जिवंत केले व आदर दिला*, त्यामुळे तुमचा भरवंसा व आशा परमेश्वरावर आहे (असावा). [22] *सच्चेपणाचा (सत्य) स्वीकार करुन तुम्ही आपला आत्मा पवित्र (शुद्ध) करून घेतला आहे, यासाठी की आपसांत तुम्हांला एकमेकांवर सच्चे (खरेखुरे) प्रेम करिता यावे (शक्य), आपल्या संपूर्ण मनाने दुसऱ्यांवर प्रेम करा. [23] कारण तुम्ही नाश होणाऱ्या नव्हे, तर नाश न होणाऱ्या (अविनाशी) बीजापासून, परमेश्वराच्या जिवंत व सदैव टिकणाऱ्या शब्दांपासून नवा जन्म* प्राप्त केला आहे. [24] *कारण हरेक मनुष्य गवतासारखा

---

त्याचा अनादर होण्याचे भय राखणे - आतंरिक जीवनाच्या हृदयस्थानी हाच पवित्र भययुक्त आदर असतो. त्यावांचून सच्चेपणाचा धर्म आपल्यांत नसतो. हेच भय आपणास दुष्टाईकरण्यापासून दूर ठेविल, चांगले करण्याचा उत्साह देईल व जशी परमेश्वराची भक्ति करावयास हवी (केली जाते) तशी करण्यांस मदतगार सिद्ध होईल. हेच प्रमुख कारण होय की बायबलमध्ये परमेश्वराचे आदरयुक्त भय राखण्याची आज्ञा (हुकुम) फर्माविलेली आहे - 2:17; प्रकटी 14:7.

***1:18** *"आजादी"*- नोट्स स्तो 78:35; मत्त 20:28.निरर्थक वागणूक- अशा प्रकारचे जीवन हरेकामध्ये ख्रिस्तांची ओळख होण्यापूर्वी होते, तसेच आत्ता देखील ही वागणूक व रिकामें कृत्य त्या सर्वांच्यात आहे जे ख्रिस्तांपासून अद्याप दूर आहेत (बायबल न समजणारे भलेही अशी विचारधारा व समज ठेवत नसले तरी) - तुल उत्प 1:2; 2:11.दुनियादारीच्या व्यर्थ-पोकळ गोष्टींनी भरलेले असणे म्हणजेच रिकामे असणे. आपल्यांपैकी कोणी एखाद्याला हा रिकामपणा व व्यर्थता जाणवते काय? तर मग या प्रभु येशूंकडे वळा, ते तुमचे जीवन, अर्थाने, हेतूने व आशेने परिपूर्ण करतील.

***1:19** - येथे त्याच मोलविषयीचा उल्लेख आहे, जे परमेश्वराने यासाठी चुकते केले की आपण 'त्याचे' लोक (प्रजा) व्हावे - मत्त 20:28; 26:28; प्रेषि 20:28; रोम 3:24-25.हे मूल्य (किंमत) शब्दांपलीकडचे आहे. कारण ते अनाकलनीय रीतिने बहुमूल्य आहे.

* *"निष्कलंक"*- 2:22; इब्री 4:15; 7:26; निर्ग 12:5; लेवी 1:3.प्रभु येशू ख्रिस्तांच्या सांडलेल्या - वाहिलेल्या रक्तावांचून या दुनियेत कोणालाच कधीही 'मुक्तता' शक्य झाली नसती - इब्री 9:22.

* *"कोंकरा"*- योहान 1:29.

***1:20** - परमेश्वराचे 'ज्ञान' या जगाच्या रचनेपूर्वीपासूनच होते. मनुष्य (मानवजाती) अपराधांत पडण्याआधीच त्याची मानवजातीच्या सुटकेची अर्थात परमेश्वरी उद्धाराची योजना बिलकुल तयारच होती, आणि येशू ख्रिस्त, परमेश्वराच्या तारण-योजनेचा 'केंद्रबिंदू-हृदयस्थान' - होते - तुल इफि 1:4; प्रेषि 2:23.

***1:21** *"ख्रिस्तांद्वारे"*- पेत्र स्पष्ट व ठळकपणे येथे सांगतो की फक्त येशूद्वारेच मानवजाती, जिवंत परमेश्वरावर विश्वास ठेविण्यास समर्थ होते. ख्रिस्तांवांचून लोक आम्ही ख्रिस्तांवर विश्वास करतो असे बोलले तरी ते चुकीच्या धारणेत असू शकतो, कारण खरे पाहाता, वास्तविक ते येशूंना ओळखत नाहीत, विश्वास ठेवत नाहीत.

* *"ज्याने...दिला"*- प्रेषि 2:32-33; 3:13; योहान 17:1.परमेश्वराने येशूंना मेलेल्यांतून जिवंत उठविल्यामुळेच आपण एका सत्य परमेश्वरावर विश्वास टाकणे शक्य झाले. सच्च्या परमेश्वरावर आपला विश्वास व आशा ही निव्वळ येशूंच्या पुनरुत्थानामुळे सहज संभव झाली, वचन 3.

***1:22** - आपला आत्मा पवित्र शुद्ध झाला आहे, मग त्याचा एकमात्र (एकमेव) मार्ग काय आहे? आपला आत्मा शुद्ध करण्याची एकच पद्धत आहे, अर्थात बायबलमध्ये परमेश्वराचा जो सच्चेपणा दर्शविला आहे, ते मानून त्याविषयी परमेश्वराचे आज्ञापालन करणे होय - तुल रोम 6:17-19; योहान 8:31-32.या शुद्धीकरणाचा व पवित्रीकरणाचा जो परिणाम होतो (आहे) ते म्हणजे 'सच्चे (लिखित-प्रामाणिक) प्रेम.' जर प्रेम हृदयात नाही, इतर विश्वासींप्रत लगाव-चाहत नाही, विश्वासींसाठी प्रेममय कळकळ नाही, तर पक्के समजून घ्या की तुमचा खरा खरा उद्धारही झाला नाहीये व सच्च्या अर्थाने पवित्रीकरण देखील झालेले नाहीच मुळी - 1 योहान 3:14; योहान 13:31.विश्वासींप्रत, विश्वासींचे कसे प्रेम असावे त्याकडे लक्ष द्या: प्रामाणिक, तीव्र कळकळीचे व शुद्ध प्रेम.'

***1:23** *"नवा जन्म"*- वचन 3; योहान 1:13. परमेश्वराचे वचन (शब्द) अविनाशी बीज आहे. नवा जन्म मनुष्यांच्या हृदयात पेरलेल्या, परमेश्वराच्या वचनांद्वारे होत असतो - याकोब 1:18.

***1:24-25**- यश 40:6-8.परमेश्वरावांचून मनुष्य स्वत: जे काही करतो, करू शकतो, त्याचा काहीच अर्थ नाही, सगळे व्यर्थ आहे, कारण ते अस्थायी आहे. याउलट, परमेश्वराचा शब्द (वचन) व त्या वचनांद्वारे ज्यांनी नवीन जन्म मिळविला आहे, त्यांचा तो विश्वास स्थायी आहे, कारण वचन सदाकाळ टिकणारे आहे - मत्त 24:35; 1 योहान 2:17.

आहे व त्याचे सर्व सौंदर्य गवताच्या फुलासारखे आहे. गवत वाळून जाते व फूल गळून पडते, [25] परंतु प्रभूचे वचन (त्याने म्हटलेल्या गोष्टी) सर्वकाळ राहील,आणि ही तीच आनंदाची खबर आहे, जी तुम्हांस सांगितली गेली होती.

# 2

[1] *यास्तवच हरेक प्रकारचे शत्रूत्व, चलाखी, कपट, ईर्षा, हेवादावा व बदनामी दूर (त्यागून) ठेवून, [2] नव्या जन्मलेल्या बाळांसारखी.*, निर्मळ आत्मिक दूधाची चाह.* (चाड-आवड) धरा, याकरिता की त्याद्वारे तुम्ही मुक्तीमध्ये (येशूची समानता) वृद्धींगत.* (वाढत) होत जावे.. [3] *कारण तुम्ही खरोखरीच येशूंच्या कृपेची चव घेतलीच (चाखली) आहे. [4] लोकांनी ज्या येशूंना निरुपयोगी.* व कुचकामी समजले होते; पण ज्यांना सर्वश्रेष्ठ आदरानिमित्त निवडलेले होते, त्याच येशूंजवळ तुम्ही आला आहा. होय, तेच येशू जे परमेश्वराच्या भवनाचा जिवंत धोंडा.* (मुख्य दगड) आहेत. [5] तुम्ही देखील स्वतः जिवंत धोंड्यांसारखे.* आत्मिक घर.* होऊन जातां, त्याद्वारे तुम्ही पुरोहितांचा.* पवित्र समूह (समुदाय) होत जातां, यासाठी की तुम्ही अशी आत्मिक अर्पणें.* आणावी जी

---

***2:1** - इफि 4:25,29,31; कल 3:5-10.या सर्व गोष्टी जुन्या स्वभावाच्या आहेत, म्हणूनच एका विश्वासीच्या जीवनात यांचे कोणतेही स्थान असता कामा नये - गल 5:19-21.

***2:2** *“नवीन जन्मलेल्या बाळांसारखी”*- कदाचित असे बोलतांना पेत्राच्या मनांत नव्याने विश्वासी झालेल्या लोकांचा विचार असावा. तसे नव्हते तर, कदाचित तो जुन्या विश्वासींवर रागें भरीत असावा, त्यांची ख्रिस्ती जीवनांत हळूहळू प्रगति होत आहे म्हणून तो दु:खी झाला असावा - तुल 1 करिं 3:1-2; इब्री 5:11-14.किंवा त्याला असे म्हणावयाचे (अर्थ) आहे की आता आपण सगळेजण आत्मिक बाळांसारखे आहोत, तुलनात्मक रीतिने प्रौढावस्था, आपण येशूंच्या द्वितीय आगमनानंतर गाठू. त्याविषयी तुल मत्त 18:3. बाळांसारख्या बालपणाच्या तीन गुणांचा तो उल्लेख करतो जे आपल्यामध्ये नेहमी असावे: 1. आतंरिक पोषणाची तीव्र इच्छा. 2. निरागसता (अबोध) व अजाणतेपणा. 3. परमेश्वरावर अवलंबून राहण्याची लालसा. आतंरिक गोष्टींविषयी भूक-तहान नसणे म्हणजे परमेश्वराच्या वचनांची अभिलाषा (इच्छा) नसणे. प्रियानों, एखाद्यामध्ये आतंरिक जीवनाची ओढ नसणे हे त्याच्यात आत्मिक जीवन नसण्याचे खात्रीदायक कारण नाहीये काय?

* *“निर्मळ ....चाह”*- ग्रीक शब्दाचा अनुवाद 'शुद्ध' म्हणजे एकतर निर्भेळ (मिलावटीवांचून) किंवा दूध न देता फसवेगिरी करणे. आपल्याला जे दूध हवे आहे, ते म्हणजे परमेश्वराच्या वचनांची शिकवण होय, तीच आपली प्राथमिक गरज होय - जुन्या व नवीन दोन्हीं विश्वासींना अशीच भूक-तहान असावी - स्तो 119:40,131.

* *“वृद्धींगत”*- इफि 4:13-15.

***2:3** - स्तो 34:8.

***2:4** *“निरुपयोगी”*- मत्त 21:42; मार्क 8:31; 9:12; लूक 17:25; योहान 1:11; प्रेषि 4:11.

* *“जिवंत धोंडा”*- अर्थात प्रभु येशू मशीहा. विश्वासी निर्जिव मुर्तीकडे जात नाहीत पण, ते एका जिवंत व्यक्तीकडे जातात.

***2:5** *“जिवंत धोंड्यांसारखे”*- येशूंकडे जे स्वत: जिवंत धोंडा आहेत, जो कोणी येतो, तो देखील जिवंत धोंडा होऊन जातो, कारण हा जिवंत धोंडा 'जीवन-देणारा-धोंडा' सुद्धा आहे - 1 करिं 15:45.

* *“आत्मिक घर”*- इफि 2:19-22; इब्री 3:6; 1 करिं 3:9.परमेश्वर एक निष्णात कारागिर व वास्तुशास्त्रज्ञ आणि बांधकाम करणारा आहे. त्याने त्याचे घर सुनियोजित पद्धतीने अचूकरित्या बांधले आहे, याविषयी शंभर टक्के गॅरंटी (शाश्वती) ठेवा. त्याला ठाऊक आहे प्रत्येक दगड कसा आहे व त्याची जागा कोठे आहे, त्या दगडाने कोठे फिट व्हावे; त्याने काही समयानंतर काही दगड फोडून काढून त्यांच्याजागी दुसरी बसवावी असे कधीही होणे नाहीच. खात्रीने तो असा परमेश्वर नाही, जो एका हाताने बाहेर काढतो व दुसऱ्या हाताने बांधीत जातो - पाहा - नोट्स - इफि 2:21.

* *“पुरोहितांचा”*- सगळे विश्वासी घराच्या स्वरूपात केवळ बांधलेच जात नाहीत, तर ते सर्व जण परमेश्वराच्या घराची सेवा करण्यासाठीचे पुरोहित सुद्धा आहेत - वचन 9; प्रकटी 1:6; इब्री 10:19-22.नवीन करारात विश्वासींमधून निवडलेले वेगळे याजकपण असा काहीही प्रकार नाहीये. एकूणएक विश्वासी पुरोहित आहे; ही गोष्ट अत्यंत लक्षणीय व महत्वाची वास्तविकता आहे की नवीन करारात कोणताही (व्यक्तीगत) शिष्य किंवा येशूंचा प्रेरित याजक म्हणविला जात नाही. ज्या लोकांना ख्रिस्तांनी चर्चसाठी पुढारी होण्यासाठी दिले, त्या कोणालाच पुरोहिताचे पद दिलेले नव्हते, या गोष्टीकडे विशेष लक्ष द्या - इफि 4:11; 1 करिं 12:28.

* *“आत्मिक अर्पणें”*- रोम 12:1; इब्री 13:15-16.याजकांकडे परमेश्वराला अर्पण करण्यासाठी काहीतरी असणे आवश्यक आहे. विश्वासी स्वत:च एक 'याजक' म्हणून आपल्या स्वत:चे स्वअर्पण त्याचे आभार प्रदर्शन स्तुति, प्रेमपूर्ण रीतिने केलेले सेवाकार्य व

येशू मशीहांच्या नांमात (ने) परमेश्वरास स्वीकार व्हावी. 6 *म्हणून बायबलमधेही लिहिलेले आहेः 'मी सीयोनांत पाया घालण्यासाठी
निवडलेला व बहुमूल्य* धोंडा (कोनशीला) बसवितो आणि जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवेल, तो कशा प्रकारेही लज्जितफज्जित
होणार नाही.' 7 म्हणून तुम्ही जे विश्वास करणारे आहा, त्या तुमच्यासाठी ते मूल्यवान* आहेत. जे लोक आज्ञा पाळत नाहीत,
त्यांच्यासाठी जो धोंडा राजमिस्त्रींनी निकामी (निरुपयोगी) सिद्ध केला व बेकार ठरविला होता, तोच 'पाया घालण्यासाठीचा*
(कोनशिलेचा) धोंडा' झाला आहे. 8 *परंतु जे सच्चेपणा मान्य करत नाहीत, त्यांनी सच्चेपणाचा अस्वीकार केल्यामुळे ते
ठेचाळण्यासाठी* नेमलेले सुध्दा होतेच. 9 पण तुम्ही मात्र एक निवडलेला* वंश, राजघराण्याचे पुरोहित*, पवित्र राष्ट्र* व परमेश्वराचे
लोक* आहा, म्हणून आता ज्याने तुम्हांला अंधारातून आपल्या उत्कृष्ट-अद्‌भुत रोशनीत* (प्रकाश) निमंत्रण दिले आहे, त्याचे
चांगुल्य* (गुणविशेष) तुम्ही प्रगट करीत चला. 10 *पूर्वी तुम्ही त्याचे लोक नव्हता ,पंरतु आता परमेश्वराची प्रजा आहा, तुमच्यावर

---

एकमेकांप्रत दयाळूपणाची भावना आपण परमेश्वरास अर्पण करू शकतो, किंबहुना, परमेश्वरास मनुष्याकडून हेच अर्पण हवे आहे.

***2:6*** - वचन 4; यश 28:16; जखऱ्या 1:4; इफि 2:20.

*"*बहुमूल्य*"*- मत्त 3:17.पाहा की मनुष्याचे विचार व परमेश्वराचे विचार कसे असतात. परमेश्वराचे विचार, विचार-शैली मानवी विचारांपेक्षा अगदी आगळीवेगळी आहे. जी इमारत ते बांधत होते, त्यासाठी येशू फिट (योग्य-उपयोगी) नाहीत असा त्या काळांतील मनुष्यांचा विचार होता.

***2:7*** *"मूल्यवान"*- 1:8. ख्रिस्त मूल्यवान केवळ त्याच लोकांसाठी आहेत, जे त्यांच्यावर विश्वास ठेवतात. केवळ विश्वास ठेवणारा विश्वसनीयच त्यांचे मोल ओळखतो. फक्त तोच येशूंवर सच्चे प्रेम करतो.

* *"पाया घालण्यासाठीचा"*- स्तो 118:22; मत्त 21:42; प्रेषि 4:11.

***2:8*** - यश 8:14; रोम 9:33. ज्यांना परमेश्वराच्या सत्याची आज्ञा पालन करून जगायचे नाहीये, ते सत्यामुळेच ठेचाळतील, सत्य न स्वीकारल्यामुळे ते धोक्यात राहातील व परमेश्वराचे सत्य म्हणजे 'येशूच' होत - लूक 2:34.जे येशूंना महिमा देतील, प्रेम करतील. ज्यांना येशू हवे आहेत, अशांना परमेश्वर उंच करील व ज्यांना येशू नको आहेत, ते खाली पडतील, अडखळतील.

* *"ठेचाळण्यासाठी"*- येथे पेत्र मुख्यत्वेकरून यहूदी लोकांनी, येशूंना जो नकार (अमान्य) दिला त्याविषयी कदाचित बोलतो आहे. प्रेषित पौल व येशूंनी परमेश्वराचे वचन शिकविण्यासाठी स्तोत्रसंहिता व यशया यांतील वचनांचा उल्लेख केला - या विषयावर पाहा, रोम अध्या. 9-11 व नोट्स विशेषत: रोम 9:14-24,30-33; 11:7-12,22-32.

***2:9*** *"निवडलेला"*- इफि 1:4,11; योहान 15:16.

* *"राजघराण्याचे पुरोहित"*- वचन 5. याचा अर्थ शक्यतोवर असा असावा: राजाचे याजक व राजाच्या सेवेसाठी नेमलेले (समर्पित) किंवा 'एक याजक समाज' जो राजाचे राज्य स्थापितो (तयार करतो) - प्रकटी 5:10,एक असा याजक-समुदाय, जो राजकुमार देखील आहे किंवा तिन्ही आहेत.

* *"पवित्र राष्ट्र"*- एक असे राष्ट्र जे पृथ्वीवरील सर्व इतर राष्ट्रांहून वेगळे राखून ठेवण्यात आले व परमेश्वराकरता पवित्र समर्पित केलेले होते - तुल, निर्ग 19:5-6; योहान 17:6.लक्ष द्या, पेत्र येथे चर्चला संबोधून नवीन इस्त्राएल अथवा आत्मिक इस्त्राएल असे बोलत नाहीये. तो यहूदी विश्वासींना हे पत्र लिहितो आहे. फक्त त्यांनाच (यहूदी विश्वासी), इतर यहूदी लोकांसाठी नव्हे (इस्त्राएल राष्ट्र), ज्यांनी ख्रिस्तांना रद्द व अमान्य केले होते. येशूंचा तिरस्कार न करता, ज्या यहूद्यांनी (इस्त्राएलाने) त्यांच्यावर विश्वास ठेविला, नेमक्या त्याच यहूदी विश्वासींना लिहितो आहे, कारण तेच इस्त्राएलाचे सच्चे यहूदी मशीही आहेत. बरे, याकडे सुद्धा लक्ष द्या की, त्याला असेही म्हणावयाचे नाहीये की जुन्या इस्त्राएली राष्ट्रासंबंधी परमेश्वर उदासीन आहे वा त्याचे त्यांच्याशी काही देणेघेणे नाहीये - तुल प्रेषि 1:6-7.नवीन कराराचा कोणताही लेखक चर्चला, नवीन इस्त्राएल म्हणून संबोधित नाही, मग त्यांनी म्हटले नाही, तर आपण देखील म्हणू नये. अन्यजातींचे विश्वासी, इस्त्राएल वंशात कलम (भरती) केले गेले आहेत - रोम अध्याय 11; इफि 2:11-19.

* *"परमेश्वराचे लोक"*- ग्रीक शब्दाचे अनेक अनुवाद येथे पाहाता येतात - सुरक्षित ठेवणे वा प्राप्त करणे वा स्वत:च्या मालकीचे असणे.

* *"उत्कृष्ट...रोशनीत"*- प्रेषि 26:18; 2 करिं 4:6; इफि 5:8; कल 1:13; 1 योहान 1:5-7.

* *"चांगुल्य"*- ग्रीक शब्द - उच्च मूल्याचे, चांगुलपणा, अत्युत्कृष्ट म्हणजे सर्व असे सद्‌गुण जे स्तुतीस पात्र असतात - पाहा, फिलि 4:8व 1:3,5,येथे ग्रीकमध्ये हाच शब्द आहे. हे प्रत्येक विश्वासीचे कर्तव्य व सुवर्ण-संधी आणि आशीर्वादाची गोष्ट होय, आत्ता या काळात, यहूदी 'ख्रिस्ती' असो वा गैरयहूदी, सर्वांनी या दुनियेतील लोकांपुढे/मध्ये एका सत्य परमेश्वराच्या महिमेचा, चांगुल्याचा, अति उत्तमतेचा गजर (घोषणा) करून जगाला सांगावयाचे आहे, की तो किती थोर आहे, त्याचा सच्चेपणा लोकांसमोर प्रस्तुत

दया झाली नव्हती परंतु आता झाली आहे. [11] अहो प्रियांनों, तुम्ही स्वतःस परदेशीय.* समजून दुनियेच्या त्या अनेक अभिलाषा.*, ज्या आत्म्याशी झुंज.* (युद्ध) देत असतात त्यांपासून स्वतःस राखा , असेच निवेदन मी तुम्हांस करितो आहे. [12] *दुसऱ्या (अन्यजाती) लोकांच्यामध्ये तुमची वर्तणूक (आचरणशैली) चांगली.* असावी, ती अशासाठी की ज्या ज्या गोष्टींविषयी, ते तुम्हांस वाईट समजून बदनाम करितात,त्यांनी तुमच्या उत्तम-कृत्यांमुळे, भलेपणाच्या कार्यांमुळे, कृपादृष्टीच्या दिवशी.* परमेश्वराची प्रशंसा करावी. [13] *येशूंखातर नागरिकांसाठी आखलेल्या (तयार) प्रत्येक प्रबंधाच्या (कायदा) आधीन असा. राजाच्या आधीन यासाठी कारण तो सर्वांच्यावर शासन करितो; [14] अधिकाऱ्यांच्या आधीन कारण ते चुकीचे वर्तन करणाऱ्यांना शिक्षा देण्यासाठी, व चांगल्या (योग्य) गोष्टी करणाऱ्यांचा सन्मान करण्यासाठी परमेश्वराद्वारे नेमलेले आहेत. [15] परमेश्वराची इच्छा अशीच आहे की तुम्ही भलेपणाची कृत्यें.*

---

(सादर) करावयाचा आहे, कारण हा प्रत्येक विश्वासीचा विशेषाधिकार आहे, जो परमेश्वरापासून दिलेला आहे. प्रियानों, आपला महिमा, आपली प्रशंसा नव्हे, तर केवळ त्याचे गौरव व स्तुति करणे एवढेच आपले कर्तव्य व विशेष अधिकार आहे - तुल, स्तो 40:10; 71:16; यश 42:12; 43:7; इफि 1:6,12,14.

*2:10** - येशूंवर विश्वास ठेवण्याआधी, हरेक यहूदी व गैरयहूदी याच्या विषयी खरे होते की, त्या समयी ते परमेश्वराचे आतंरिक लोक (प्रजा) नव्हते - होशेय 1:9-10; 2:23; रोम 9:24-26; इफि 2:11-12.अधांरात पडलेल्या लोकांना रोशनीत आणण्याचे कार्य परमेश्वर, केवळ कृपेमुळे करतो, त्याची कृपा लोकांना बोलाविते व ते प्रकाशाकडे येतात - तीताला 3:5.

***2:11** *"परदेशीय"*- 1:17 - म्हणजे असे लोक जे आत्ता त्यांच्या स्वतःच्या सच्च्या घरांपासून दूर राहात आहेत - अर्थात - स्वर्ग

* *"दुनियेच्या...अभिलाषा"*- 1:14. या लालसा या जगाच्या आहेत, म्हणजे ज्यांचा संबंध मनुष्याच्या अपराधमय स्वभावाशी आहे; परंतु, दुसरीकडे विश्वासी स्वर्गाचे नागरिक (लोक) आहेत.

* *"झुंज"*- वाईट गोष्टींची अभिलाषा किंवा दुष्टाई करण्याची लालसा. सैतान विश्वासींशी लढतांना हीच हत्यारें वापरतो - इफि 6:11-12.दुष्ट इच्छा एखाद्या धारदार तरवारीसारख्या असतात, त्या आपले आत्मिक जीवन कापतात, घायाळ करून आतंरिक जीवन पंगु व जखमी करतात; अनैतिकतेची लालसा जणू काही ज्वालामय बाणांसारखी विश्वासींच्या मनात घुसते, शिरून अशी काही रूतून बसते, ज्यामुळे आपले विचार परमेश्वर व त्याच्या पवित्रतेपासून वळून दुनियेकडे लागतात. ज्याप्रमाणे बंदूकीच्या गोळया शरीराला घायाळ करतात, त्याचप्रमाणे सैतान आपला आत्मा घायाळ करून इतक्या जखमा करतो की पीडा व दुःखसहन प्राणांतिक होते. या सर्व भीषण व गंभीर कारणांमुळेच सैतानाला आपल्या हृदयात स्थान तर देऊच नका, पण सावध राहून त्याच्या आहारी देखील जाऊच नका. दूर राहण्याचा व स्वतःस राखण्याचा जो हुकुम आहे, याचा अर्थ हाच की परमेश्वराच्या दये-कृपेने आपण सैतानापासून दूर राहून स्वतःचे रक्षण करू शकतो. कोणत्याही कशाही प्रकारच्या दुष्ट कामनेपासून शंभर टक्के लांब राहाणे - प्रियांनों, आपले लक्ष्य हेच असावे. कारण जर आपण वाईट-इच्छेला आपल्या मनात प्रवेश करू दिला, तर काही समयानंतर ती तुमच्यावर भारी पडेल, तुम्ही तिला परवानगी दिली म्हणून ती आणखी प्रबळ होईल. दुसरे म्हणजे अशी इच्छा काढून मनाच्या बाहेर, फेकण्याऐवजी तशाच अनेक अभिलाषांना अनुमति देणे, तुम्हांस सोपे वाटेल म्हणजे एकदा प्रवेशाची परवानगी दिली, तर झुंज देणे कठीण, पण स्वागत करणे सहज वाटेल. वाईटांपासून (इच्छा) दूर राहाणे हाच बुद्धीचा मार्ग आहे, हाच मार्ग परमेश्वर आपल्याला शिकवतो. हा मार्ग निवडण्यासाठी विश्वासीची निवड व इच्छा गुंतलेली आहे, काय निवडायचे काय नाही, ही त्यांची मर्जी आहे - प्रियांनों, विश्वासी बंधूभगिनिनों, सैतानाच्या दुष्ट लालसांपासून दूर राहून त्यांना आपल्या मनांत येण्याची परवानगी न देऊन, स्वतःला राखून ठेवण्याची व परमेश्वराने तिच्यावर मात करण्याचा जो मार्ग शिकविला आहे, त्यावर चालत राहून ख्रिस्ती जीवन जगण्याची निवड करा.

***2:12** - पाहा, मत्त 5:16.

* *"चांगली"*- ग्रीक शब्दाचा अनुवाद - सर्वोत्कृष्ट, प्रशंसनीय, तारीफ करण्यालायकीचे आदरात्मक, आकर्षक व चांगले - येशूंना नाकारणाऱ्यांना, विश्वासींची बदनामी करणे खूप आवडते, जेथे मिळेल, तेथे त्यांची चूक (कमजोरी) पकडणे, त्यांवर बोट ठेवणे, मग एक संपली की दुसरी खुरापत शोधून काढणे हाच अविश्वासींचा आवडता उद्योग होय. पण जर सकारात्मक विचार केला, तर हीच निंदा आपणांस आणखी, उत्साहाने अधिक उत्तम रीतिने कार्य करण्याचे उत्तेजन देते, ती बदनामी आपल्या द्वारे त्यांहून जास्त उत्तम कर्तबगारी घडविते, म्हणजे आपल्याला उत्साही करते. हे त्यांचे दुष्कृत्य आपल्या कल्याणाचे निमित्त ठरते.

* *"कृपादृष्टीच्या दिवशी"*- याचा इशारा दोन बाबींकडे होऊ शकेल - आशीर्वादाचा हमखास समय अथवा परमेश्वरापासून येणारा न्याय.

***2:13-14** रोम 13:1-5.

***2:15** *"भलेपणाची कृत्यें"*- बाचाबाची - फुकटची बडबड व वादविवाद जे करू (साध्य) शकत नाही, नेमकी तिच (हेतू पूर्ण)

करून त्याद्वारे बेअक्कल [*](बुद्धीहीन) लोकांच्या अजाणपणाच्या कार्यांना[*] आळा (बंद करा) घालावा. [16] [*]स्वतःस स्वतंत्र (मोकळे)
समजा, परंतु आपले हे स्वातंत्र्य दुष्टाईसाठी लपणघर (दडणे) करू नका व स्वतःस परमेश्वराचे सेवक समजून जगा. [17] सर्वांचा[*]
आदर राखा, भाऊबहिणींवर प्रेम करा, परमेश्वराचे भय बाळगा[*] व राजास सन्मान द्या[*]. [18] हे सेवकांनो[*], संपूर्ण आदरासह आपल्या
स्वामींच्या आधीन असा, केवळ चांगल्या व नम्र स्वामींच्याच नव्हे, परंतु निर्दयी (क्रूर) स्वामींच्या देखील. [19] जर एखादा कोणी
परमेश्वराचे स्मरण बाळगून, अन्यायामुळे दुःख सहन करत असतो, तर ही मोठ्या प्रशंसेची बाब[*] आहे. [20] [*]कारण जर तुम्ही अपराध
करून ठोसे खाल्ले (हाणले गेला) आणि त्यानंतर धीर धरिला, तर त्यात कोणती मोठी गोष्ट आहे? परंतु जर सत्कर्मे (भलेपणाची
कृत्यें-कार्य) करून दुःख सहन करिता व तरीही धीर सोडत नाही[*], तेव्हा अशा प्रकारच्या तुमच्या योग्य आचरणाद्वारे परमेश्वरास
आनंद होत असतो. [21] अशाच जीवनासाठी तुम्ही बोलाविले देखील गेला आहा[*], कारण मशीहांनी सुद्धा दुःखें सोसून (सहन)
तुमच्यासाठी, किंबहुना तुमच्यासमोर एक नमूना ठेविला (पुढे केला) आहे की तुम्ही त्यांच्यासारखेच व्हावे[*]. [22] [*]येशूंनी, ना कोणता
अपराध केला, ना त्यांच्या मुखांतून छळाचा कोणताही शब्द (गोष्ट) निघाला. [23] [*]त्यांनी शिवी ऐकून शिवी दिली नाही व दुःख सहन
करून कोणाला धमकी देखील दिली नाही, तर त्यांनी निष्पक्षावांचून न्याय करणारा जो परमेश्वर, त्याच्या हवाली सर्व काही करुन

---

कल्याणकृत्यें करू शकतात, सतोड उत्तर देण्याचे कार्य करणारे शस्त्र होय; विश्वासींचे-बदललेले व पवित्र जीवन हाच वादविवादांवरचा सोपा उपाय आहे.

[*] *“बेअक्कल”*- रोम 1:21-22.

[*] *“बेअक्कल...कार्यांना”*- 1:14; 2 पेत्र 3:16.अज्ञानामुळे व अजाण असल्यामुळे ते ख्रिस्तांविरुद्ध बोलतात. त्याचे पहिले-प्रमुख कारण हेच की त्यांना ख्रिस्तांच्या सुवार्तेविषयी व एका सत्य परमेश्वराविषयी काहीही माहीत नसते (नाहीये) - योहान 15:21; इफि 4:17-18.

[*]**2:16** - पाहा, गल 5:13; रोम 6:15-18.

[*]**2:17** *“सर्वांचा”*- श्रीमंत असो वा गरीब, उच्चवंशीय अथवा हलक्या जातीचा, शिक्षीत आणि अंगठा-बहादुर. सर्व प्रकारचा जातीय घमेंड रंग-वंश यांच्या श्रेष्ठत्वाचा गर्व कसलीही भेदभाव करण्याची भावना त्यागणे, अतिशय आवश्यक आहे. विश्वासींनी कोणाला सुद्धा कमी-नीच किंवा तुच्छ समजू नये - तुल रोम 12:10; याकोब 2:1-4,9; 1 करिं 12:14-26; प्रेषि 6:1.

[*] *“परमेश्वराचे भय बाळगा”*- 1:17, जसा परमेश्वरावर प्रेम करण्याचा हुकुम सोडलेला (दिलेला) आहे, अगदी त्याचप्रमाणे सर्व विश्वासींना निर्देश दिलेला - हुकुम केलेला आहे की त्यांनी परमेश्वराचे भय बाळगावे. खरे म्हटले तर, आदरयुक्त भय, सन्मान व भयचकित करणारी भन्नाट भावना परमेश्वरावरच्या प्रेमासह, हातांत-हात घालून चालत असते; या दोन्हीं भावना वेगळ्या केल्या जाऊ शकत नाहीत मुळी. ख्रिस्ती लोकांना हा हुकुम केलेला आहे, म्हणून आपल्याजवळ ही दोन्हीं भाव-प्रतिकें (भावना) आहेत की नाही, याची खात्री करून घेणे आवश्यक आहे आणि जर तसे नसेल, तर दावीदासारखी आपण सुद्धा प्रार्थना करावी जशी त्याने परमेश्वराचा धावा करून केली होती - स्तो 86:11.

[*] *“राजास सन्मान द्या”*- तुल रोम 13:1-7.

[*]**2:18** *“सेवकांनो”*- इफि 6:5-8; कल 3:22-24.

[*]**2:19** *“प्रशंसेची बाब”*- परमेश्वर स्वत: अशा लोकांची वाहवा करील व अशा लोकांना योग्य प्रतिफळ (बक्षिस) देईल.

[*]**2:20** - तुल 4:15-16.

[*] *“तरीही...नाही”*- म्हणजे रागें न भरता, बदला (सूड) न घेता धैर्य दाखविणे, हिमंतीने तोंड देऊन गप्प राहाणे.

[*]**2:21** *“बोलाविले...आहा”*- ज्या वेळी परमेश्वराने, आपल्याला त्याचे स्वतःचे हमखास लोक म्हणून पाचारण केले (हाक मारली) त्या वेळी चांगल्या कार्यांकरता दुःख-सहन हा सुद्धा त्या पाचारणाचा एक भाग आहे. प्रभु येशू ख्रिस्त हे कल्याणकृत्यांमुळे झालेल्या दुःखसहनाचा, महत्वपूर्ण व ठळक नमूना आहेत. जो आपल्यासमोर एक आदर्श म्हणून ठेविलेला आहे. जे चांगले त्यावांचून येशूंनी दुसरे काही केले नव्हते, परंतु, आपल्या सर्वांपेक्षा प्रचंड भक्कम दुःख त्यांच्या वांट्याला आले.

[*] *“त्यांच्यासारखेच व्हावे”*- मत्त 4:19; 8:22; 16:24; 19:21; लूक 9:23; योहान 1:43; 10:4,27; 12:26; रोम 15:5; 1 करिं 11:1.ज्यांचा विचार आहे व ज्यांना वाटते की ते येशूंवर विश्वास ठेवतात परन्तु त्यांच्यासारखे वागणार नाही, होणार नाही, असे लोक स्वत:ला फसवीत आहेत.

[*]**2:22** - यश 53:9; मत्त 27:23; योहान 8:46; 19:4; 2 करिं 5:21; इब्री 4:15; 7:26.

[*]**2:23** - यश 53:7; मत्त 26:63; 27:12-14; लूक 23:8-9.आपण येशूंसारखेच व्हावे, तसेच वागावे, तसेच वावरावे. जो निष्पक्षावांचून न्याय करतो (देतो) त्या परमेश्वराच्या हाती सर्व सुपूर्द करावे, कारण तोच न्याय्य-न्यायाधीश आहे.

टाकले. 24 [*]आमचे गुन्हें आपल्या देही वांहूनते स्वतःच क्रूसावर खिळले , ज्याअर्थी त्यांनी क्रूसावर आमचे गुन्हें ‘नेले’[*] त्याअर्थी
आता आम्ही अपराधांपासून (अनुचित गोष्टी) दूर जाऊन उत्तम कृत्यांकरिता[*] जगावे; त्यांना घायाळ (जख्मी) केल्यामुळे तुम्ही बरे
झाले आहा[*] (व परमेश्‍वराशी तुमचा संबंध स्थापिला गेला आहे). 25 पूर्वी तुम्ही भटकलेल्या[*] मेंढरांप्रमाणे होता, पण आता मात्र
तुमच्या प्राणांचा मेंढपाळ[*] व तुमचे संरक्षण (देखरेख-सांभाळ) करणाऱ्याजवळ[*] तुम्ही परत आला (येऊन चुकला) आहा.

# 3

1 हे पत्नींनों, अशा रीतिनेच तुम्ही देखील आपल्या पतींचा अधिकार स्वीकार करा[*], त्यांचा देखील जे परमेश्वराचा स्वीकार
करण्यास तयार नाहीयेत. 2 तुम्ही काही न बोलल्यावांचून (न बोलतांही) सुद्धा, तुमची आचरण शैली[*] पाहूनच[*] ते येशूंचा स्वीकार
करणारे[*] होतील. 3 तुम्ही त्या बाह्य सौंदर्यासंबंधी अधिक विचार करू नका, जी नाना प्रकारची केश-रचना (स्टाइल),
किमती-महागडी आभूषणें व आकर्षक-सुंदर वस्त्रांनी येत असते. 4 [*]शांत स्वभावाचे एक आगळेच आंतरिक सौंदर्य आहे, जे
परमेश्वराच्या दृष्टीने अत्यंत मोलवान आहे, तीच सुंदरता तुमची ओळख असावयास हवी. 5 [*]प्राचीन समयांत, परमेश्वरावर प्रेम
करणाऱ्या स्त्रिया अशाच रीतिने आपल्या स्वतःस सजवीत असत. त्या परमेश्वरावर भरंवसा ठेवून पतीच्या आधीनतेत समर्पित रहात
असत. 6 उदाहरणासाठी साराविषयी[*] पाहा, अब्राहामाला ती ‘माझे स्वामी’ असे संबोधीत (बोलावीत) असे. पाहा, जर तुम्ही सुद्धा

---

[*]**2:24** - या वचनात अगदी अचूक सटीक व सर्वाधिक स्पष्टीकरण देणारे विधान आहे. बायबलमधील परमेश्वराचे वचन ठळकपणे सांगते की येशूंनी आपले (विश्वासींचे) स्थान घेतले, अपराध आम्ही केले होते, पण येशू अपराध झाले व आमच्या बदली (ऐवजी) त्यांनी अपराधी लोकांचे ते रिकामे स्थान भरले, जेथे अपराधी म्हणून उभे राहणे परमेश्वरी दृष्टीने अति आवश्यक होते - पाहा, 3:18; यश 53:5; मत्त 20:28; योहान 1:29; 10:11,14; रोम 3:25; 2 करिं 5:14,21; इब्री 9:28.विश्वासींनों, येथे ख्रिस्तांच्या दुःख-छळांचा व मरणाचा हेतू पाहा. तुल रोम 14:9; 2 करिं 5:15.

[*]*“क्रूसावर...नेले”*- रोम 6:10-14; गल 2:20; 5:24; कल 3:5.

[*]*“उत्तम कृत्यांकरिता”*- रोम 6:18-19; 14:19,21; 2 करिं 5:21; इफि 4:24; फिलि 1:11; 1 तीम 6:11.

[*]*“नीटसे...झाला आहा”*- यश 53:5.अपराध आपण केलेले (आपले) होते, जो दंड यातना व शिक्षा येशूंनी सहन केली, त्या दुःख सहनामुळेच आपण मुक्त झालो.

[*]**2:25** *“भटकलेल्या”*- यश 53:6.

[*]*“मेंढपाळ”*- 5:4; योहान 10:1-8.

[*]*“संरक्षण करणाऱ्याजवळ”*- प्रेषि 20:28; फिलि 1:1व तीताला 1:7यांत चर्चचे वडील व पुढाऱ्यांसाठी ‘हाच’ शब्द उपयोगात आणलेला आहे. येशू मुख्य मेंढपाळ आहेत, जसे ख्रिस्त प्रमुख देखरेख, संरक्षण व सांभाळ करणारे आहेत, त्यांच्यासारखे एकमात्र तेच आहेत, दुसरा नाहीच मुळी.

[*]**3:1-2** *“अधिकार...करा”*- इफि 5:22-24.

[*]**3:2** *“आचरण शैली”*- परमेश्वराच्या वचनानुसार - मुख्यत्वे येशूवार्ता.

[*]*“न ..पाहूनच”*- जरी वाद आणि इतर गोष्टी असल्या तरीही, वचनांनुसार आचरण शैली पाहून अविश्वासी पति येशूंसाठी मिळवून घेतले जातील. पत्नीनों, उपदेश करत राहिला तर पति ख्रिस्तांकडे येण्याऐवजी आणखी दूर जातील.

[*]*“स्वीकार करणारे”*- येशूंसाठी जिंकले जातील - तुल 1 करिं 7:16.

[*]**3:4** - तुल यश 3:16-23; 1 तीम 2:9-10.केश-श्रृंगार, फॅशन, आभूषणांचा वापर, आकर्षक वस्त्रें या सर्वांमुळे पति ख्रिस्तांकडे येणार नाही, परंतु, त्याऐवजी तिचे हृदय, सोन्यावर नव्हे, तर परमेश्वराने जे आचरण नियम दिले आहेत, त्यांनुसार ‘परमेश्वर-प्रिय’ असणारे जीवन व्यतित करून आपले आंतरिक जीवन कृपामय केले, तर भरपूर आशा आहे. “आगळेच आतंरिक सौंदर्य” एक असा पैलू आहे, जो बाह्य सुंदरतेहून कितीतरी श्रेष्ठ आहे; ते असे सौंदर्य आहे, जे कधीही कोमेजणार आणि फिके पडणार नाही. तुल, नीति 31:10-31.जागतिक चर्च व या दुनियेच्या स्त्रियांनी जर अशा प्रकारच्या आंतरिक सौंदर्याकडे गंभीरतेने लक्ष केंद्रित केले, तर ही दुनिया अधिक उत्तम होईल.

[*]**3:5-6** - पवित्रता परमेश्वरावरची आशा आणि समर्पित (आधीन) आत्मा ही सगळी सौंदर्याची लक्षणीय चिन्हें आहेत, ही अशीच सुंदरता सर्व विश्वासी स्त्रियांमध्ये असावी अशी परमेश्वराची इच्छा आहे.

[*]**3:6** *“साराविषयी”*- उत्प 18:12.

तिच्याप्रमाणेच ते सगळे केले जे उचित आहे, व कोणत्याच गोष्टीने भयभीत होत नसाल तर (तेव्हा) तिच्याच कन्या.[*] ठराल. 7 [*]त्याच
प्रकारे अहो पतींनों, आपल्या पत्नींचा आदर करा. समज.[*] ठेवून त्यांच्याशी व्यवहार (वर्तन) करा. ती कमजोर.[*] असू शकते, पण
तुम्ही दोघे सुद्धा परमेश्वराच्या नव्या जीवनाच्या वरदानात (कृपादान) समान-सोबती (जोडीदार) आहा. असे केले तर, तुमच्या
प्रार्थनांच्या उत्तरांत बाधा येणार नाही.[*]. 8 [*]सार (मर्म) हाच आहे की तुम्ही सगळयांनी एकमन, सांत्वन (सहानुभूती) व प्रेमाने भरलेले,
दयाळू आणि नम्र असावयास हवे. 9 दुष्टाईच्या बदल्यांत दुष्टाई व अपमानाबद्दल अपमान करुं नका, परंतु याउलट आशीर्वाद द्या
कारण तुमचे पाचारण अशाच प्रकारचे आहे आणि तेव्हाच तुम्हांला आशीर्वाद मिळेल.[*]. 10 [*]कारण जो कोणी आपल्या हिताचा
विचार करत असतो आणि चांगले दिवस पाहण्याची कामना करितो, त्याने आपली जीभ दुष्टाईपासून (कपटी-वचन) व ओठ
लबाडीपासून सतर्कतेने राखणे गरजेचे आहे. 11 दुष्टाईकडे वळून त्याने हित-कार्ये (भलेपणाची कृत्येंची) केली पाहिजे. त्याने
दुसऱ्यांबरोबर मेळाने (सख्य) रहावयास हवे. 12 त्याचे कारण हेच आहे की येशू मशीहांचे डोळे क्षमा झालेल्या (केलेल्या) लोकांकडे
व त्यांचे कान त्यांच्या प्रार्थना-निवेदनांकडे लागलेले असतात, वाईट कृत्यें करणाऱ्यांपासून ते आपले मुख वळवितात. 13 [*]तुम्ही जर,
योग्य-न्याय्य व हितकार्यें (भलेपणाची) करण्याचा मनोमन-निर्धार करून चुकला आहा, तर कोण तुमचे काही वाकडें (हानि) करू
शकेल, 14 [*]पण वास्तविकता हीच आहे, की जर तुम्ही न्याय्य व उचित कार्य केल्यामुळे त्रास सहन करिता, तर खात्रीने तुम्हांला
त्याचे प्रतिफळ मिळेल, म्हणून भिऊ नका.[*] व काळजी सुद्धा करू नका. 15 याऐवजी येशूंना आपल्या जीवनाचा स्वामी समजून

---

[*] *“कन्या”*- अब्राहम हा सर्व विश्वासींचा 'बाप' आहे - रोम 4:16.सारा ही सर्व विश्वासी स्त्रियांची 'माय' आहे, फक्त त्याच स्त्रियांची, ज्या आपआपल्या पतींच्या आधीन आहेत.

[*]**3:7** - इफि 5:25,28; कल 3:19.पेत्र ख्रिस्ती पतींना संबोधित करतो आहे.

[*] *“समज”*- पतींनी पत्नींची समस्या जाणून घेतली पाहिजे, त्यांच्या इच्छा, दुर्बलता लक्षात घेऊन जरी यांपैकी कोणतेही कारण असले तरी समंजसपणे त्यांनी, त्यांचा आदर करावा, मान द्यावा.

[*] *“कमजोर”*- स्त्री शारीरिक रीत्या कमजोर असते, परंतु, मानसिक रीतिने नाही, त्यांची विचार शैली वेगळी आहे व भावनात्मक रीतिने त्यांची बनावट भिन्न प्रकारची आहे. त्यांचे पद (पारिवारिक) थोडके कमी आहे, म्हणूनच त्यांच आहेत ज्यांनी पतींच्या स्वाधीन राहून त्यांची आज्ञा पाळायची आहे.

[*] *“प्रार्थनांच्या...नाही”*- विवाहबद्ध जोडप्यांची जर अशी इच्छा असेल की त्यांनी केलेल्या प्रार्थनांचे उत्तर परमेश्वर बापाकडून त्यांना मिळावे, तर एकमेकांशी ते कसे वागतात, जोडीदारांप्रत त्यांचा संबंध व व्यवहार कसा आहे, याविषयी त्यांनी जागृत व सतर्क असावयाचे आहे, नव्हे राहायला हवेच; कारण परमेश्वर अशा पतिच्या प्रार्थनेचे उत्तर देण्यास नाकारेल, जो आपल्या स्त्रीशी (पत्नी) अत्यंत वाईट व्यवहार-संबंध ठेवतो. त्याच प्रकारे जी पत्नी आपल्या पतीच्या स्वाधीन राहून, पूर्ण समर्पणाने वागणे टाळते आणि तसे करणे मान्य करत नाही, तिच्या प्रार्थनेचे उत्तर देणे देखील परमेश्वर बाप अमान्य करेल.

[*]**3:8-9** - रोम 12:9-17; इफि 4:2-3,32; फिलि 2:2-3; कल 3:12-14; लूक 6:28; योहान 13:34; 1 थेस्स 5:15.

[*]**3:9** *“आशीर्वाद मिळेल”*- 1:3-5; गल 3:14; इफि 1:3.विश्वासींनो, परमेश्वराचे आशीर्वाद जणू आपल्यावर ओतलेच जातात, आणि भविष्यकाळी येणारे जे आशीर्वाद आपली वाट पाहात आहेत, त्या पैलूकडे बारीक लक्ष केंद्रित करा, परमेश्वराच्या दृष्टिकोनाचा गंभीर विचार केला नसेल, तर करा आणि म्हणूनच ते आशीर्वाद मिळविण्यासाठी, या दुनियेत परमेश्वराच्या इच्छेनुसार, दुसऱ्यांचा बदला (सूड) घेण्याचे सोडून केवळ आशीर्वाद देण्याचीच इच्छा मनी धरा (असू द्या), दुसऱ्यांना आशीर्वाद द्या.

[*]**3:10-12** - स्तो 34:12-16.वचन 8 व 9 मध्ये, परमेश्वर जसे जीवन जगण्याची आज्ञा करतो, त्याप्रमाणे जर आपण जीवन जगत नसूं, तर आपल्याला चांगले (आशीर्वादित) दिवस दाखविण्याऐवजी परमेश्वर वाईट दिवस दाखवू शकतो; इतकेच केवळ नव्हे तर तो त्याचे कान देखील वळवेल व तुमची प्रार्थना ऐकावयास कान बंद करेल, मग तुमची प्रार्थना ऐकली जाणार नाही, परमेश्वर उत्तर देणार नाही.

[*]**3:13** - रोम 13:3.अविश्वासी सुद्धा दयाळूपणाचे वर्तन ओळखतात, त्याचे कौतुक करतात, करूणेचा भाव व व्यवहार त्यांना आवडतो, अशा प्रकारच्या वर्तनशैलीची ते स्तुति-वाहवा करतात. विश्वासींनी शापाऐवजी आशीर्वाद दिला, वाईटाऐवजी चांगले केले हे अविश्वासी, न्याहाळीत असतात, म्हणूनच आपली जीवन-वर्तनशैली नीट राखून ठेवा.

[*]**3:14** - आपण चांगल्या कार्यासाठी त्रास व छळ सहन करणे, ही या दुनियेत आपल्याबरोबर घडणारी सामान्य घटना आहे; वारंवार त्याची शक्यता आहे - 2:19-20; 4:12-13. जर आपल्याबरोबर असे घडत असेल, तर आपण येशूंचे ते सत्य नेहमी आठवणीत ठेवावे, जे त्यांनी मत्त 5:10-12यांत सांगितले होते.

[*] *“भिऊ नका”*- यश 8:12;तुल मत्त 10:26,28,31; योहान 14:27.

(जाणीवेने) त्यांची उपासना करा*. जर कोणी तुम्हांला तुमच्या उम्मेदीविषयी (आशेविषयी) विचारले तर, अशा मनुष्यास व्यवस्थित समजावून (स्पष्टीकरण) देण्यासाठी नेहमी तयार* असा. [16] परंतु, नीट समजवण्याचे महत्वाचे कार्य देखील आदर, दीनता व शुद्ध विवेकांसह* करा, यासाठी की जे लोक तुमच्या ख्रिस्ती वर्तन-शैलीची खिलाफत (विरोध) करितात, त्यांना तुमच्यावर आरोप ठेवतांना लज्जेचा* अनुभव (लाज वाटावीच) व्हावाच. [17] *आणि हो, जर परमेश्वरास असे होणे मंजूर (मान्य) असेल, तर आपण चुकीचे कार्य करून दंड भोगण्याऐवजी, योग्य व बरोबर असलेले कार्य करून दुःख-क्लेश सोसणेच सर्वोत्तम आहे. [18] *कारण निर्दोषी येशू मशीहांनी देखील अपराधांखातर एकदांच* दुःख* सोसले. जेणेकरून परमेश्वराविरुद्ध बंडाळी* करणाऱ्यांचा व परमेश्वराचा मेळ (समेट) शक्य व्हावा. त्यांनी देहामध्ये मरण सहन तर केलेच*, पण पवित्र आत्म्यामध्ये* (द्वारे) जिवंत उठविले गेले*. [19] **त्या वेळेस त्यांनी न्यायिक अटकेत बंद (डांबलेल्या) आत्म्यांना* आनंदाची खबरबात ऐकविली*. [20] जेव्हा नोहा जहाज

---

*3:15 - *"जीवनाचा...करा"*- 'स्वामी' समजणे म्हणजे परमेश्वराला प्रभु मानून इतरांपासून अगदी वेगळे स्थान देणे, इतरांना संपूर्णत: बाजूला सारून केवळ त्याचीच उपासना करणे, इतर सगळे लोक (दुनिया) एकीकडे व परमेश्वर-प्रभु एकीकडे असे. पाहा, आपण ज्याची भक्ति-आराधना करतो, पूर्ण जाणीव व अख्ख्या विवेकांसह, संपूर्ण समर्पण व इच्छा बाळगून, भारावलेल्या अंत:करणाने त्याचेच स्मरण करणे, दंडवत घालणे, प्रियकरांसारखे त्याच्या प्रेमात पडणे व त्याची आज्ञा पाळणे, अशीच अपेक्षा परमेश्वर सर्व विश्वासींतर्फे करतो.

* *"नेहमी तयार"*- इफि 5:15-16.आधी स्वत: प्रत्येक विश्वासीने जाणून-पारखून घ्यावयाचे आहे की तो का विश्वासी (झाला) आहे, ख्रिस्तांचे विश्वासी म्हणून, का त्याच्यासाठी स्वर्गात एक आशा आहे आणि मग जेव्हा त्याला नीटनीट उमगते, तेव्हाच तो दुसऱ्यांना त्याविषयी सांगू शकेल, किंबहुना त्याने येशूवार्तेसाठी स्वत:स समर्थ करून घ्यावे ते सुद्धा अगदी स्पष्टपणे व प्रभावीरित्या. इतरांना पटवून देण्याच्या लायकीचे स्वत:स करावे.

***3:16** *"विवेकांसह"*- प्रेषि 23:1; 24:16; 2 करिं 1:12; 1 तीम 1:5,19; 3:9.

* *"लज्जेचा"*- 2:15.

***3:17** - पाहा, 2:20; 4:15-16.

***3:18** - पाहा, 2:24

* *"एकदांच"*- योहान 19:30; इब्री 9:25-28; 10:11.

* *"दुःख"*- 2:21; 4:1.

* *"परमेश्वराविरुद्ध बंडाळी"*- वाचकहो, आपण स्वभावाने नेमके हे असेच आहोत, रोम 1:29-32; 3:9-20,23.येशूंनी केलेल्या दुःखसहनांचे कारण व हेतू पाहा, अपराधी लोकांसाठी केलेले हे बलिदान यासाठीच होते की आपल्या सर्वांना येशूंनी पित्यापर्यंत न्यावे (आणावे), तुल, इफि 2:13,18; इब्री 10:19-22; योहान 14:6.

* *"मरण .....केलेच"*- मत्त 16:21; 27:50,58-60; मार्क 15:43-45; योहान 19:32-34; 1 करिं 15:3.

* *"आत्म्यांमध्ये"*- परमेश्वराच्या पवित्र आत्म्यांमध्ये - योहान 14:16-17; मत्त 3:16.

* *"जिवंत...गेले"*- मत्त 28:6; रोम 1:4.

***3:19-22** - हा भाग समजण्यास कठीण व काहींसा अस्पष्ट (धूसर) असा आहे. असे वाटते की कधीतरी त्यांचे मरण व स्वर्गारोहण यां दरम्यान येशू कोठेतरी गेले व तुरुंगातील काही कैदी-आत्म्यांना त्यांनी काहीतरी (कशाविषयी तरी घोषणा) सांगितले. पाहा, येथे पेत्र आपल्याला याविषयी सांगत नाहीये की 'आत्में' किंवा 'तुरुंग' म्हणजे काय अथवा येशूंचा तेथे जाण्याचा हेतू काय होता. काही लोकांचा असा विचार आहे की पेत्राने जे काही सांगितले, त्याचा अर्थ हा असावा: येशू मशीहांचा आत्मा नोहांत असणे, त्या समयी जेव्हा तो त्याच्या काळी (वेळी) असलेल्या लोकांना परमेश्वराचा संदेश देत असे, पण असा अर्थ लावणे म्हणजे वचन 19 च्या शब्दांकडे दुर्लक्ष करणेच ठरेल.

***3:19** - मरणांपश्चात येशू ख्रिस्त खरोखरीच कोठे गेले असावेत? निश्चितच दुःखसहनासाठी ख्रिस्त नरकांत उतरले नाहीत. त्यांची सगळी पीडा-दंड व दुःखसहन क्रूसावरच संपलेले होते - योहान 19:30.परंतु, असे वाटते की येशू एका अदृश्य परिसीमेत (क्षेत्र) गेले, जे मृतकांचे क्षेत्र आहे, ज्यांस इब्री भाषेत 'शिओल' असे म्हणतात - इफि 4:9; स्तो 16:10.

* *"आत्म्यांना"*- पेत्र मनुष्याच्या आत्म्याकडे संकेत करत नाहीये, म्हणून जे लोक महाजलप्रलयाने मेले होते, हे तेच होते असा विचार करण्याचे काहीएक कारण नाहीये. बायबलमध्ये शब्द "आत्में" हा कधी कधी एकतर दुष्टात्में नाहीतर देवदूत यांच्यासाठीही उल्लेखला जातो - मत्त 8:16; इब्री 1:14.

* *"आनंदाची...ऐकविली"*- परंतु, पेत्राला असे म्हणायचे नाही की 'येशूवार्ता ऐकविली. पेत्राने 'केरूस्सो' असा शब्द वापरला,

बनवीत होता, तेव्हा (त्या समयी) परमेश्वर याच आज्ञा मोडणाऱ्यांची * प्रतिक्षा करीत होता, यासाठी की त्यांनी आपले मन-परिवर्तन करावे. परंतु, असे झाले नाही आणि जलप्रलयानंतर फक्त आठच * लोक वांचविले गेले *. [21] हा बाप्तिस्म्याकडे केलेला इशारा आहे (दर्शवितो); जो स्वतःच मुक्ति प्राप्त करण्याचा संकेत प्रगट करितो - हा बाप्तिस्मा * देहाची मलीनता (घाण) स्वच्छ करत नाही *, परंतु

---

ज्यानुसार इंग्रजीत 'हेरॉल्ड' असा अर्थ होईल; म्हणजे 'लवकरच काही घडणार आहे, अशी पूर्वसूचना देणे.'

*3:20 *"आज्ञा मोडणाऱ्यांची"*- हे सत्य दोन्हींसाठी म्हणजे देवदूत व जे लोक जे महाजलप्रलयापूर्वी होते - यहूदा 1:6-7; 2 पेत्र 2:4; उत्प 6:2-7.

* *"आठ"*- नोहा, त्याची पत्नी, त्याचे तीन मुलगे व त्यांच्या बायका - उत्प 6:10; 7:1.

* *"वांचविले गेले"*- पहिल्या वाक्याची तुलना पुढच्या वचनाशी करा. लक्ष द्या की जलप्रलयाच्या पाण्यामधून जहाजाने जाण्याद्वारे त्यांचा बचाव झाला, अगदी त्याचप्रमाणे बाप्तिस्म्याच्या पाण्यांत (मध्ये) गेल्यामुळे आत्ता विश्वासी वांचविले जातात. अर्थात पाण्यांतून (जल) गेल्यामुळे ते वांचले नव्हतेच खरे, पण जलपोतांत (जहाज) शिरून गेल्यामुळे (आंत असणे) महाजलप्रलयाच्या प्रवाहांतून जाणाऱ्या त्या जहाजाद्वारे त्यांचा नाश झाला नाही व ते मरणांपासून वाचले. 'जहाजाच्या आंत असणे' - अर्थात जणू काही संकटांतून व मरणांतून काढून सुरक्षित ठिकाणी त्यांना पोचते करण्यास जहाजाने साहाय्य केले, व महाजलापासून होणाऱ्या नाशांतून सोडवून घेलते.

***3:21** *"बाप्तिस्मा"*- नोट्स - मत्त 3:6,13-16; 28:19; मार्क 16:16; प्रेषि 2:38.महाजलप्रलयाचे 'जल' हा पाण्याच्या बाप्तिस्म्याकडे इशारा (चित्र) करतो. ग्रीक शब्द 'तंतोतंत प्रतिनिधीत्व' व याचा उपयोग अनेकवचनी स्वरूपांत केलेला आहे - इब्री 9:24.ज्या प्रकारे तंबूतील पवित्र स्थान हे स्वर्गाच्या पवित्रस्थानाचे चित्र होते, अगदी त्या चप्रकारे जलप्रलयाचे जल हे सुद्धा "बाप्तिस्म्याचे"तंतोतंत प्रतिनिधीत्व करणारे चित्र होय. आता स्पष्ट कळते की नोहा व त्याचे कुटूंब सुरक्षित होते, पण जलांत राहिल्यामुळे नव्हे, तर जहाजांत आल्यामुळे. जहाज 'ख्रिस्त येशूंचे प्रतिक' (संकेत) आहेत - उत्प 7:24.जलांपासून त्यांना वांचविले गेले होते - वचन 20. इब्री 11:7ठळकपणे, स्पष्ट करते की ते सर्व जण विश्वासाद्वारे वाचले. तर मग, जर बाप्तिस्मा हा जलप्रलयाच्या (महापूर) जलाच्या अगदी अनुरूप आहे व जल-बाप्तिस्म्याकडे इशारा करतो, तर बाप्तिस्म्याची विधी (धार्मिक समारंभ) स्वत:च (स्वबळाने) आपल्याला कशी वाचवू शकेल? नोहा व त्याचे कुटूंब जहाजांत होते व प्रलयाच्या पूरांच्या जलाने त्यांचे कोणतेही नुकसान होण्यापासून जहाजाने त्यांना वाचविले, तेव्हाच आपण म्हणू शकतो (विचार करणे) की बाप्तिस्मा कोणालाही वाचवू शकतो. उद्धारासाठी व नवजीवनासाठी सर्वप्रथम आपण येशूंच्या जलनौकेत शिरतो, आपले 'उद्धार जहाज' येशू आहेत, आणि येशूंवरच्या विश्वासामुळे आपण मुक्त झालो व नवीन जीवन मिळविले, तर त्यानंतर आपण पाण्याच्या बाप्तिस्म्यातून जावयाचेच आहे. तुल, मार्क 16:16.जर येशूंमध्ये आपण नाहीच म्हणजे आपला उद्धार झाला नसेल, तर आपला बाप्तिस्मा (जल) होऊच नये; कारण बाप्तिस्मा तर, येशूंचे मरण व पुनरुत्थान यांचे केवळ चित्र आहे, त्याद्वारे आपण येशूंशी जुळलो व आपला बापाशी समेट झाला असे प्रगट होते. बायबल मात्र याविषयी अगदी अगदी स्पष्ट सांगते की आपणांस काय (कसे वाचतो) वाचविते: 1. परमेश्वर आपल्याला त्याच्या दयेद्वारे, स्वत:च वाचवितो - तीताला 3:4-5. 2. येशू आपणास उद्धार देतात - मत्त 1:21; रोम 5:9-10. 3. येशू ख्रिस्तांचे रक्त आपल्याला वाचविते - इफि 1:7. 4. येशू मशीहांचे बलिदान आपल्याला वाचवून नवजीवन देते - इब्री 10:10,14. 5. विश्वासाद्वारे अनुग्रहामुळे आपले तारण होते - इफि 2:8-9; प्रेषि 16:31; रोम 3:22-25; योहान 5:24; इब्री 10:39. आनंदाच्या वार्तेवर विश्वास ठेविल्यामुळे आपण मुक्त (तारण) होतो - 1 करिं 15:1-4; प्रेषि 10:44-47. पुढे पेत्र असे म्हणतो की आपण जी जिवंत आशा बाळगतो, ती केवळ परमेश्वराच्या थोर कृपे-दयेमुळे आपल्याला मिळाली आहे, परमेश्वराने आपल्याला नवीन जन्म देऊन ते प्रगट केले आहे - 1:3.

* *"हा बाप्तिस्मा...नाही"*- पेत्र स्पष्ट करतो की हा बाप्तिस्म्याचा अर्थ नव्हेच मुळी. 'देह' किंवा 'शरीर' या ग्रीक शब्दाचे अनेक अर्थ आहेत; त्यांत मनुष्याचे शरीर व मनुष्याच्या मनांत असलेला पतित (अपराधी) स्वभाव या दोन्हींचा समोवश आहे. बाप्तिस्मा या दोन्हींशी संबंधित (व्यवहार करीत) नाही. त्याचा संबंध मनुष्याच्या आंतरिक व्यक्तीशी (मनुष्यत्व) आहे - अर्थात परमेश्वरासमक्ष, शुद्ध विवेकाची एक विनंती'- हा बाप्तिस्म्याचा खरा अर्थ असू शकेल - तुलना इब्री 9:14;येथे स्पष्ट कळते की मशीहांचे रक्त आपला विवेक शुद्ध करते. बाप्तिस्मा - 'सार्वजनिक व उघड घोषणा' आहे की जे लोक तो घेतात, ते स्पष्टपणे अंगिकार (घोषणा) करतात की यापुढे जशी परमेश्वराची इच्छा आहे त्यानुसार आम्ही जीवन जगू. आपला विवेक शांत (थंड) ठेवणार (करणार) नाही, विवेक अपवित्र करणार नाही व परमेश्वर बापास जसे प्रिय आहे, तसे आचरण करू. यहूदी लोकांची सुंता जशी मुक्ति (तारीत) देत नाही, तशीच बाप्तिस्म्याची विधी पूर्ण केली, तरी त्यामुळे उद्धार होत नाही - रोम 2:28-29.बाप्तिस्म्याचा व्यवहार व आचरणाचे महत्व ज्याद्वारे दिसते, त्याच प्रकारचे हृदय बाळगणे आवश्यक आहे, अर्थात येशूं ख्रिस्तांप्रत विश्वासाने आधीन (समर्पण) असणे. लक्ष द्या

परमेश्वरासमक्ष जणू काही शुद्ध-विवेकाची एक विनंती (अपील) आहे. येशू ख्रिस्त मेलेल्यांतून जिवंत झाल्यामुळे, [22] *स्वर्गात पोचून
ते परमेश्वराबरोबर संपूर्ण अधिकारांसह विराजमान आहेत, त्याच येशूंच्या आधीन स्वर्गदूत, अधिकारी व ताकदी आहेत.

# 4

[1] *यासाठी जेव्हा मशीहांनी देहामध्ये दुःख सहन केले तर तुम्ही देखील हाच रवैय्या (मनाची तयारी) जणू काही हत्यारासारखा
धारण करा अशासाठी, की जो देहाठायी दुःख सहन करतो तो अपराधांपासून आजाद झाला आहे. [2] म्हणून देहामधील ही उर्वरित
(बाकीची) जिंदगी , मनुष्यांच्या अभिलाषांठायी नव्हे, पण परमेश्वराच्या इच्छेनुरूप घालवा. [3] *कारण दुनियेतील जगिक वृत्तीच्या
लोकांची शैली (स्टाईल) जशी :कामुकता, दारू-व्यसन, रंगेलपणा व दारूपाटर्या आणि घृणित मूर्तीपूजा * यां सर्वांत तुम्ही जो वेळ
फुकट घालविला होता तितकांच बहुत (पुरे) झाला आहे. [4] *या सर्व गोष्टींत अविश्वासींना याचेच आश्चर्य वाटते, की अशा घोर व
भारी दुष्कृत्यांत आता तुम्ही त्यांची साथ देत नाहीये, म्हणूनच तर ते तुमची निदांनालस्ती करितात. [5] पण येशू जे जिवंत आहेत व
मेलेल्यांचा न्याय करणार आहेत, त्याच येशूंपुढे त्या लोकांना त्यांच्या कृत्यांचा (करणींचा) हिशेब द्यावा लागेल *. [6] *मेलेल्या
लोकांना देखील येशू-वार्ता (आनंदाची खबर) यासाठीच ऐकविली गेली होती, की देहाठायी तर त्यांचा न्याय मनुष्यांनुसार व्हावा,

---

की आपण, येशू मशीहांचे मेलेल्यांतून जिवंत उठणे झाल्यामुळेच वाचलो (स्वतंत्र) आहोत - तुल रोम 4:25.

***3:22** - प्रेषि 2:33; इफि 1:20-21; फिलि 2:9-11; इब्री 1:3.

***4:1-2** - येशूंनी अपराधांपासून आपली सुटका (मोकळे) करण्यासाठी दुःख सहन केले - 2:24; 3:18. अपराधाविरुद्धच्या झुंजीत दुःख असले तरी ते सहन करण्याची आपली इच्छा (तयारी) असावयास हवी. जर असा रवैय्या ठेवला, तर खात्रीने ते आपल्या झुंजीत युद्ध-हत्यारांसारखे सिद्ध होईल. मशीहा अपराधांसाठी मेले, म्हणून विश्वासीने या गोष्टीची समज व जाणीव ठेवावी की तो येशूंशी जोडलेला आहे, आणि हे सत्य सुद्धा ओळखून घ्यावे की येशूंमध्ये तो देखील अपराधांसाठी मेलाच आहे - रोम 6:5-13; कल 3:3. ख्रिस्त येशूंच्या दुःखसहनाच्या रोशनीत विश्वासींनी देखील अपराधांसाठी संपूर्ण रीतिने म्हणून जावे व त्यांपासून स्वतःला कायमचे बाजूला सारावे. आपल्या इच्छांच्या पूर्तिसाठी नव्हे, तर परमेश्वराची इच्छा पूर्ण करण्याच्या हेतूनेच आपण जगावयाचे आहे - रोम 8:5,12; 12:1-2; कल 1:9; 4:12; 1 थेस्स 4:3; इब्री 13:21.

***4:3** - तुल, तीताला 3:3; 1 तीम 1:13; इफि 2:1-3; 1 करिं 6:11.पाहा, येशूंची वार्ता लोकांच्या अपराधांच्या खोलीपर्यंत (अपराध-तळाशी) जाऊन त्यांचे जीवन अनंतकाळासाठी पार बदलून टाकू शकते. लक्षात ठेवा की मूर्तीपूजेचा धर्म व येथे वर्णित जीवनशैली, अर्थात - कामुकता, दारु-व्यसन, रंगेलबाजी, दारूपाटर्या, या सर्व हातांत हात घालून मजेशीरपणे खेळत-बागडत सोबत जातात.

* *“घृणित मूर्तीपूजा”*- अनु 7:25; 12:31; 13:12-14; 17:2-5; 27:15; 29:17; 32:16.

***4:4** - अशा सर्व विश्वासींचे जीवन ज्यांनी जुने जीवन त्यागिले आहे, व जे आता येशूंचा रवैय्या अंगि ठेवून जगत आहेत व ज्यांचे नवीन जीवन अजूनही जुनेच आहे (शैली), त्यांच्यासाठी एक प्रकारे क्रोध (परमेश्वरी) ठरतो. अधर्माचे (अनैतिक) जीवन जगणाऱ्यांसाठी ते अंशिक रीतिने बदनामी, वाईट वागणूक, अत्याचार व निंदानालस्तीचे कारण आहे - मत्त 12:36; प्रेषि 10:43; 17:31; रोम 2:16; 14:12; 2 तीम 4:1; इब्री 4:13.

***4:5** *“हिशेब...लागेल”*- रोम 14:12.

***4:6** - हे वचन देखील समजण्यास कठीण व अस्पष्ट आहे. त्याचा अर्थ काहीसा असा असू शकतो. काही मेलेले लोक आहेत, ज्यांना त्या वेळी येशूवार्ता सांगितलेली होती, ज्या वेळी ते या पृथ्वीवर हयात (जिवंत) होते. मेलेल्यांना सांगितलेल्या मुक्तिवार्तेचा व वर्तमानकाळी आत्ता जे जिवंत आहेत, त्यांना आनंदाची खबरबात देण्याचा एकमेव हेतू सारखाच होता - अर्थात त्यांना आतंरिक जीवन मिळावे आणि त्यांनी परमेश्वराच्या इच्छेसाठी जिवंत राहावे (जगावे) - वचन 2. काहींच्या मतें, ते मेले होते म्हणून जिवंतपणी येशूवार्ता ऐकण्याची संधी त्यांना लाभली नव्हती, म्हणून त्यांना ती मरणानंतर ऐकविली गेली. या अर्थाचा (वचनाचा) संबंध ते 3:9शी लवतात आणि असा विश्वास ठेवतात की ‘आत्में’ म्हणजे, जे लोक मरण पावले होते त्यांचे आत्में. तरीही अशी शिकवण, बायबलच्या कोणत्याच पुस्तकात आढळत नाही, म्हणून त्यावर विश्वास ठेवण्याची अजिबात गरज नाही, कारण माणसाच्या बुद्धीने लावलेला हा अर्थ, त्या वचनांचा आहे जे अगोदरच कठीण व समजावयास अस्पष्ट आहेत. जे परमेश्वराने प्रगट केले, प्रकाशनाद्वारे स्पष्ट व ठळकपणे सांगितले, ते आपण अनु 29:29वाचतो. दुसऱ्या काही लोकांच्या मतें, ‘मेलेले’ म्हणजे जे त्यांच्या 'अपराधांत मेले' - इफि 2:10.परंतु हा अर्थही येथे खरा वाटत नाही.

परंतु आत्म्यांत त्यांनी परमेश्वरानुसार जगावे. [7]सर्व काही लवकरच व अचानक[*] संपणार आहे, म्हणून समंजसपणाने[*] प्रार्थनेत रमलेले (आसक्त) असा. [8]प्रेम[*] असंख्य गुन्हें झाकून[*] टाकते, यास्तवच एकमेकांवर प्रेम करणे हीच सर्वश्रेष्ठ बाब ठरेल. [9] [*]एकमेकांचा पाहुणचार कुरकुर न करिता (विनातक्रार) करा. [10]ज्याला जे वरदान[*] मिळाले आहे, त्याने ते परमेश्वराच्या अनेकविध कृपेसह भल्या-शहाण्या कारभाऱ्यांप्रमाणे[*], एकमेकांच्या सेवेप्रीत्यर्थ[*]. [11]ज्याला शिकविण्याचे कार्य मिळाले आहे, त्याने असे बोलावे[*] (शिकवणे) जणू काही परमेश्वरच त्याच्या माध्यमातून बोलतो आहे. जर तुम्हांला दुसऱ्याचे साहाय्य करण्याची क्षमता मिळाली आहे, तर परमेश्वरापासून प्राप्त होणाऱ्या शक्तीने[*] इतरांची मदत करा. असे केले तर येशू ख्रिस्तांद्वारे, परमेश्वराला प्रत्येक

---

[*]**4:7** *"लवकरच व अचानक"*- रोम 13:12; 5:9; प्रकटी 1:3; याकोब 5:8; 2 पेत्र 3:8-9; मत्त 24:36,42.या युगाच्या अंतसमयी मोठी संकटें, परीक्षा व व्यापक प्रमाणांत फसवेगिरी, धोकेबाजी होईल - मत्त 24:4-14,21-25.खरे-सच्चे व दृढ असून ख्रिस्तांना बिलगून ठामपणे उभे राहण्यासाठी प्रार्थनाही अत्याधिक महत्वाची व गंभीर बाब ठरेल. येथे नीट पाहा की खरी-सच्ची प्रार्थना करण्यासाठी कोणत्या दोन गुणांची नितांत गरज आहे - तुल, लूक 21:36; 22:40,46.

[*]*"समंजसपणाने"*- ग्रीक अनुवादानुसार एक असे मन जे सशक्त निरोगी व स्वस्थ आहे, जे अर्थहीन विचार व विकृत कल्पनांपासून राखलेले, व दूर आहे, एक असे मन जे हरेक तऱ्हेने तंदुरूस्त व सुदृढ आहे.

[*]**4:8** *"प्रेम"*- 1:22; योहान 13:34; 15:12,17; 1 योहान 3:11,18; 4:8.येथे पेत्र प्रेमासाठी येणारा 'परमेश्वरी प्रेम' या शब्दाचा उपयोग करतो - पाहा, 1 करिं 13:1.

[*]*"झाकून"*- नीट समजून घेण्याचा प्रयत्न करू या की, याचा अर्थ काय आहे आणि काय नाहीये. पेत्र चर्चमधील अनुशासनाविषयी म्हणजे एखाद्या स्थानिक चर्चविषयी सांगतो, जे अपराधांचा खुलासा करून, उघड करून, निकाल लावून त्याचे समापन करण्याऐवजी, अपराध झाकून ठेवते, त्याविषयी येथे बोलत नाहीये. तुल, मत्त 18:15-17; प्रेषि 5:1-11; 1 करिं 5:1-5,12,13.पेत्र येथे या गोष्टीवर भर देतो आहे की प्रेम वैयक्तिक संबंध कसे राखते व त्यांत प्रेमाची भूमिका कशी/काय असते. पाहा, नीति 10:12.इतरांचे अपराध खुले करण्याचे कार्य प्रेम करत नसते. प्रेम दुसऱ्यांना लाजिरवाणे करण्यात रस ठेवत नाही. आपसांतील संबंध राखतांना एखाद्याची निंदा-निर्भत्सना करण्याची इच्छा प्रेम ठेवत नाही. तशी वेळही आणत नाही. प्रेम, प्रत्येकाला परमेश्वराकडे वळविण्याचे भरसक प्रयत्न करत असते. हे सर्व कार्य करतांना प्रेम सर्वोत्तम योगदान देते. खरे म्हटले तर केवळ परमेश्वर खरोखरीच अपराध झाकू शकतो, म्हणून प्रेम एखाद्यास परमेश्वरापर्यंत आणण्याचा भरसक प्रयत्न करते. तुल, स्तो 32:1-2; रोम 4:6-8; याकोब 5:20. येथे पेत्र कदाचित विश्वासींना आठवण करून देतो आहे की प्रेम क्षमा करेल व सतत करत राहील - 1 करिं 13:5; मत्त 18:21-22.कदाचित पेत्राचा असा अर्थ सुद्धा असू शकतो की जर आपल्यात प्रेम आहे, तर परमेश्वर आपलेही असंख्य (अगणित) अपराध क्षमा करतो (झाकून देतो) - तुल, लूक 7:47-50.प्रेम जेथे कोठे आढळते, त्याची लक्षणें व स्वभाव पेत्र खात्रीने येथे सादर करतो. परमेश्वरी प्रेम सर्वदा अपराध झाकण्याच्या मार्गाच्या शोधात असते, अर्थात तसे करताना प्रेम परमेश्वरी प्रेमास अनुकूल असलेला न्याय्य व पवित्रतेचा मार्गच अनुसरते - तुल, उत्प 3:21; 9:21-23; प्रकटी 3:18-19.आणि होय, जे अपराध एखाद्यासाठी हानिचे कारण ठरत असेल किंवा सतत अपराध करत राहण्यास प्रोत्साहन देत असेल, अशा प्रकारचे अपराध प्रेम कधी-कधीच झाकणार नाही हे नीट जाणून घ्यावे. जे अपराध करतात त्यांनी ते अपराध सोडून, त्यागून द्यावेत अशा स्थानापर्यंत आणण्याचा प्रयत्न प्रेम चिकाटीने व सतत करत असते - तुल, नीति 28:13.सच्चे प्रेम अपराधासाठी कदापि, कशाही प्रकारे प्रोत्साहन देणार नाही.

[*]**4:9** - रोम 12:13; 16:23; इब्री 3:2; 3 योहान 8. प्रेम प्रगट करण्याचा हा एक 'भाव', एक पद्धत आहे.

[*]**4:10** *"वरदान (कृपादान)"*- रोम 12:6-8; 1 करिं 12:4-11; इफि 4:7-13.

[*]*"कारभाऱ्यांप्रमाणे"*- मत्त 24:45-47; 1 करिं 4:1-2.

[*]*"एकमेकांच्या सेवेप्रीत्यर्थ"*- ज्यांच्या ठायी प्रेम असते, ते परमेश्वराने दिलेली सगळी क्षमता, योग्यता उपयोगी आणून इतरांची मदत करण्यात रमलेले असतात, पण ते असे स्वत:चा वैयक्तिक विकास, लाभ, पैसा किंवा प्रसिद्धीसाठी अजिबात करत नसतात.

[*]**4:11** *"बोलावे"*- 'बायबल उपयोगात आणून भिन्न प्रकारे बोलण्याची कोणतीही सेवा, असा संकेत आहे. ज्यांना शिकविण्याची सेवा मिळाली आहे, त्यांनी पूर्णपणे भानांवर राहून ख्रिस्तांच्या जागी आपण उभे आहोत, याची सतर्कता बाळगून ख्रिस्तांचा प्रतिनिधी व राजदूत या नात्याने आपले स्थान घ्यावे, येशूंची प्रतिष्ठा राखून संपूर्ण अधिकाराने परमेश्वराचे वचन बोलावे वा शिकवावे.

[*]*"परमेश्वरापासून...शक्तीने"*- आपल्या वैयक्तिक स्वाभाविक क्षमतेने व शक्तीने शिकविण्याचा, सेवा करण्याचा प्रयत्न करण्याची दाट संभावना (शक्यता) येथे आहे, पण त्याचा काही लाभ नसणार आहे.

गोष्टीत प्रशंसा व आदर मिळेल.*. सर्व सर्व महिमा (शान) व अधिकार त्याचाच आहे. होय, असेच व्हावे. [12] प्रियानों, दुःखरूपी अग्नी-परीक्षा.* ज्यांमधून तुम्ही जातां (गुदरता) आहा, त्यामुळे तुमच्याबरोबर काहीतरी विचित्र गोष्टी घडत आहेत, असे समजून आश्चर्यचकित.* होऊ नका. [13] याऐवजी, तुम्ही आनंदित.* असावयास हवे, कारण या अवघड परिस्थितींतून गुदरल्याने (मुळे) तुम्ही मशीहांबरोबर त्यांच्या दुःखाचे हिस्सेदार व्हाल. नंतर मग, अख्ख्या दुनियेसमोर त्यांचे आगळेवेगळे गौरव (महिमा) प्रगट झाल्यावर.* तुम्हांला खूप खूप आनंद होईल. [14] जर येशू मशीहांचे म्हणविल्यामुळे (नांवामुळे) तुम्हांला लज्जित केले गेले तर खुश व्हाल.*, कारण महिमेचा आत्मा.* जो परमेश्वराचा आत्मा आहे तुमच्यात राहतो (वसतो). [15] *एखादा खूनी, चोर, दुष्टाईची कृत्यें करणारा व दुसऱ्यांच्या कार्यांत दखल देणारा (ढवळाढवळ) आहे, म्हणून तुमच्यांतील एकानेही दुःख सहन करता कामा नये.
[16] परंतु जर कोणी (तो) मशीहांचा आहे म्हणून कशा प्रकारेही दुःख सहन करत असेल, तर त्याने लज्जित होता कामा नये.* परंतु त्याने त्याच्या "ख्रिस्ती" या (येशूंच्या) नांमामुळे परमेश्वराचा महिमा करावा. [17] पाहा, वेळ आल्यावर परमेश्वराच्या घरापासूनच.* न्यायाची.* (पुरस्कार-वितरण) सुरवात होईल. म्हणून जर असेच होणार असेल, तर त्या लोकांचे होणार तरी काय ज्यांनी परमेश्वराची

---

* *"परमेश्वराला...मिळेल"*- आपल्या सेवेचा हेतू व निशाणा हाच असाच असावा. प्रत्येके सेवेचे लक्ष्य हेच असावे. जे लोक स्वत:च्या व्यक्तीगत महिमेसाठी (कदाचित अजाणपणे) बोलतात, शिकवतात किंवा सेवा करतात, ते परमेश्वराचा महिमा चोरणारे ठरतात, कारण असे लोक परमेश्वराचा गौरव, जो फक्त त्याचाच (नांवे) आहे, ते स्वत: घेत आहेत, असे लोक परमेश्वराचा नांवलौकिक लुबाडणारे-लुटारू आहेत - तुल, मत्त 6:2,5; 1 करिं 10:31.

* *"अग्नी-परीक्षा"*- येथे पेत्र जसे धातूं अग्नीत जाळले जाऊन शुद्ध-चोखे होत असतात, त्या प्रक्रियेविषयी बोलतो आहे. मोह-परीक्षा-पारख यांसंबंधी त्याला सांगावयाचे आहे - पाहा, 1:7; स्तो 66:10.या अग्नीपरीक्षेमुळे आपण पारखले जातो व शुद्ध होत असतो.

* **4:12** *"आश्चर्यचकित"*- ख्रिस्त व त्यांच्या प्रेषितांनी वारंवार चेतावनी दिली होती की संकटें, समस्या, छळ, इत्या. सर्व सर्व येतील (शकतील) - 2:20-21; 4:1; योहान 16:33; प्रेषि 14:22; रोम 8:17; 2 तीम 3:12.

* **4:13** *"आनंदित"*- मत्त 5:11-12; प्रेषि 5:41; रोम 5:3; कल 1:24; याकोब 1:2.जेव्हा कधी विश्वासी परीक्षांना तोंड देत असतो, तेव्हा तेव्हा त्याने काय करावे, याविषयी हा परमेश्वराने आपल्याला दिलेला नेहमीचा निर्देश आहे. या परीक्षांप्रतचा आपला रवैय्या व आंतरिक दृष्टिकोन अत्याधिक महत्वाचा आहे. परीक्षांचा सामना करतांना, दुःख सहन करतांना, आपण कधी कधीच तक्रार व कुरकुर करता कामा नये, आपण निराश, निरुत्साह व लाचार-हताश होता कामा नये. परमेश्वरावरच संपूर्ण विश्वास ठेवा - समाधानी असा, की केवळ तोच सर्वोत्तम पद्धतीने आपले भले करणे हाताळू शकतो, फक्त परमेश्वरालाच ठाऊक आहे की आपल्यासाठी काय सर्वोत्कृष्ट व फायद्याचे आहे, यास्तव रोम 8:28चे स्मरण ठेवून सदैव आनंदातच मग्न राहा. लक्षात असू द्या की ही अग्नीमय संकटें (छळ) झेलणे, सहन करणे, त्यांत टिकून आशावादी होणे, म्हणजेच खऱ्या (सच्च्या) अर्थाने मशीहांच्या दुःखाचे भागीदार (भाग घेणे) होणे होय -

* *"गौरव...झाल्यावर"*- 2 करिं 1:5; तीताला 2:13.त्या समयी आपल्याला, आपल्या परीक्षांसाठीची दुःखांसाठींची व छळांसाठींची बक्षिसें (पुरस्कार) दिली जातील - रोम 8:17-18; 2 करिं 4:17-18.

* **4:14** *"खुश व्हाल"*- पाहा, लूक 6:22.हे फक्त त्याच अपमानाविषयी सत्य आहे, जे आपण मशीहांचे म्हणविल्यामुळे सहन केले (झेलणे) आहे, इतर कोणत्याही अन्य कारणासाठी नव्हेच मुळी.

* *"महिमेचा आत्मा"*- परमेश्वराचा आत्मा, स्वर्गाच्या (स्वर्गीक) महिमेपासून येतो आणि पुन्हा विश्वासींना महिमामय स्वर्गाकडे घेऊन जातो. आत्ता तो विश्वासींच्यावर आहे - प्रेषि 1:8; 1 योहान 2:20;व विश्वासी ज्या धीराने व खंबीरपणे सगळया छळांतून व अपमानांतून जातात, आणि येशूंच्या नांवाखातर ती छी-छी, थू-थू सहन करतात, हेच सबळ प्रमाण आहे की परमेश्वराच्या महिमेचा आत्मा त्यांच्यावर आहे.

* **4:15-16** - पाहा, 2:19-20.

* **4:16** *"लज्जित...नये"*- तुल, प्रेषि 5:41; इब्री 11:26.येशूंचे नांव घेतल्यामुळे येशूंच्या नांवाने सेवा केल्यामुळे किंवा म्हणविले जाण्याने, ख्रिस्ती लोकांनी दुःख सहन करावे कारण ज्या दुनियेत आपण जगत आहोत, तिची पद्धत अशीच आहे - योहान 15:18-25; 16:1-4.हे जग स्वत:च्या इच्छेने, स्वत:च्या निवडीनुसारच अंधारांत आहे, त्यामुळे ते आतंरिक प्रकाशाचा तिरस्कार करते, अर्थात या दुनियावी लोकांना आत्मिक प्रकाशाची घृणा वाटते - योहान 3:19-20.

* **4:17** *"घरापासूनच"*- गल 6:10; इफि 2:19.

* *"न्यायाची"*- 1 करिं 11:31-32; 2 थेस्स 1:5.परमेश्वराचा विश्वासींशी कडक व्यवहार करण्याचा हेतू काय असेल? परमेश्वर केवळ

येशू-वार्ता स्वीकारलीच नाहीये.[*]? 18 [*]आणि ज्याअर्थी येशूंच्या लोकांकरिता, त्यांच्या विश्वासाखातर या दुनियेचे जीवन संपुष्टात (संपणे) आणून, भविष्यातील जीवनात दाखल होईपर्यंत दुःखाची रास (बहुत पीडा) मांडलेलीच आहे.[*], त्याअर्थी येशू ख्रिस्तांचा स्वीकार न करणारे.[*] भविष्यकाळातील जीवनाचे दुःख (न्याय) कसे सहन करू शकणार आहेत? 19 म्हणून ते जे परमेश्वराच्या इच्छेनुसार दुःख सोसीत असतात, त्यांनी सुद्धा शहाणपणाचे वर्तन (वागणूक शैली) करून.[*], स्वतःस विश्वसनीय रचनाकाराच्या सुपूर्द करून द्यावे.[*].

# 5

1 तुमच्या येथील वडील पुढाऱ्यांप्रमाणेच मी देखील ख्रिस्तांच्या पिडेचा (दुःख) साक्षी.[*] राहिलो आहे, व भविष्यकाळी येणाऱ्या गौरवाच.ा सुद्धा भागीदार आहे; मी तुमच्या चर्चमधील वडील-चर्चला.[*] (पुढारी) दिलासा देऊ इच्छितो, 2 [*]की तेथे जे परमेश्वराचे

---

विश्वासींना याच एका मुख्य कारणाने वेगवेगळया तऱ्हेने अनुशासित करतो, तो अशासाठी की दुनियेत राहणाऱ्या अविश्वासींबरोबर विश्वासींनी दोषी ठरू नये.

[*] *"स्वीकारलीच नाहीये"*- योहान 3:36; 2 थेस्स 1:8-9;नोट्स प्रेषि 22:10.

[*]**4:18** - नीति 11:31. 1.

[*] *"दुःखांची...आहे"*- मार्क 10:24.विश्वासी व नीतिमानांचे तारण का कठीण आहे बरे? विश्वासाखातर विश्वासींना दुःखाची अत्याधिक पीडा का भोगावी लागणार आहे? खालील बाबीं पाहा: त्यांचे शत्रु बेशुमार, असंख्य तर आहेतच पण ते प्रचंड शक्तीमान देखील आहेत - 5:8; इफि 6:11-12. नीतिमान कमजोर व दुर्बल आहेत, त्यांच्यात काही अंशी अजूनही अपराधी स्वभाव कायम आहे - रोम 6:19; 7:18; 8:26; गल 5:16-17; 1 योहान 1:8. परमेश्वराचा जे' पेराल ते कापाल' हा सिद्धांत आहे, तो विश्वासींवर सुद्धा लागू होतोच, ते त्यांच्यापासून वांचू व सुटू शकत नाहीत - रोम 2:6-8; 6:7-8. परमेश्वराला विश्वासीं त्यांच्या आचार-विचारांत व वर्तनांत, सक्तीने नीतिमान करावयाचेच आहेत. परमेश्वराची आचार-संहिता अत्युच्च श्रेणीची आहे. त्याने त्यांसाठीची काही तत्वें व सिद्धांत आखून ठेवलेले आहेत. त्यांचे पालन, त्याच्या (परमेश्वराच्या) लोकांनी सक्तीने व अचूकपणे करून ते पूर्ण करावयाचे आहेत. त्यांना अरूंद (लहान) मार्गाने केवळ प्रवेशच करायचा नाहीये, तर त्यासाठीची पूर्वतयारी म्हणून अरूंद मार्गावरच राहावयाचे देखील आहे - मत्त 7:13-14. त्यांनी स्वत:च्या इच्छेस नकार देण्याचे शिकावयाचे आहे, स्वेच्छेला नव्हे तर परमेश्वरी इच्छेला प्राधान्य देऊन त्याप्रमाणे करावयाचेच आहे - मत्त 7:21;तसेच येशूंचे अनुसरण करण्यासाठी सर्व काही त्यागून, सोडून - लूक 14:33प्रमाणे जगावयाचे आहे. पवित्रतेनुसार जीवन जगणे, त्यांनी शिकावयाचे आहेच - योहान 10:27; इब्री 12:6. मोठमोठ्याल्या परीक्षांतून व अग्निपरीक्षांतून पारखले जाऊन सुरक्षितपणे त्यांनी बाहेर पडायचे आहे व अनुशासनप्रिय (शिस्त) असावयाचे आहे - इब्री 12:5-13.विश्वासींनी शेवटपर्यंत विश्वासात टिकून (चिव्वटपणे) राहावयाचे आहे - इब्री 10:38-39. प्रियानों, विश्वासींनों, जरी नीतिमानांची मुक्ति व नीतिमत्व भयंकर कठीण असते, तरी (ते) शाश्वत व शंभर टक्के खात्रीचे आहे, हे समजून घ्या - 1:5; योहान 6:39; 10:28; रोम 5:9-10.

*"येशू ख्रिस्तांचा...करणारे"*- मग पाहा की जर नीतीचे जीवन एवढे अवघड (कठीण) आहे, तर जे येशूंना सपशेल नाकारतात, थेट अस्वीकार करतात, जे येशूंचा अरूंद मार्ग रद्द करून मनमानी करतात, त्यांची इच्छा तुच्छ लेखितात, पवित्रता व विश्वास यांची घृणा बाळगतात. अशा सगळया लोकांसाठी कोणती आशा आहे? नाहीच मुळी, कोणतीच आशा नाहीये.

[*] *"येशू ख्रिस्तांचा...करणारे"*- मग पाहा की जर नीतीचे जीवन एवढे अवघड (कठीण) आहे, तर जे येशूंना सपशेल नाकारतात, थेट अस्वीकार करतात, जे येशूंचा अरूंद मार्ग रद्द करून मनमानी करतात, त्यांची इच्छा तुच्छ लेखितात, पवित्रता व विश्वास यांची घृणा बाळगतात. अशा सगळया लोकांसाठी कोणती आशा आहे? नाहीच मुळी, कोणतीच आशा नाहीये.

[*]**4:19** *"न्याय्य वर्तन-शैली"*- 2:12,15; 3:11; रोम 2:7; 2 करिं 5:10; 9:8; गल 6:9-10; इफि 2:10; कल 1:10; 2 तीम 3:17; तीताला 2:14.नीट ध्यानांत (कायम) ठेवा: कितीही परीक्षा, मोह, अपमान, छळ, किंवा परमेश्वरी शिस्त जीवनात कायम असली, तरी देखील यांपैकी कोणत्याही कारणाने इतरांचे हित व कल्याण-कृत्यें, करत राहण्याचे कार्य, विश्वासींनी सोडून देता कामा नये.

[*]**4:19** *"विश्वसनीय...सुपूर्द"*- 5:7; स्तो 31:5; 37:5; प्रेषि 20:32.

[*]**5:1** *"साक्षी"*- येशूंच्या प्रारंभिक (पहिल्यावहिल्या) प्रेषितांतील पेत्र हा अगदी सुरवातीपासूनच (सुवार्तेची) येशूंचा शिष्य होता.

*"येणाऱ्या गौरवाचा"*- रोम 8:17-18.

[*] *"वडील-चर्च"*- प्रेषि 14:23; 15:2; 20:17; 1 तीम 4:14; 5:17; तीताला 1:5.

(विश्वासीं) लोक आहेत, त्यांचे संरक्षण करा. त्यांची देखरेख यासाठी करू नका की करावयाचीच आहे, वा त्यामुळे काही धनलाभ*
होईल, पण (ते कार्य) परमेश्वराच्या मार्गदर्शनात व आनंदाने* त्यांचे संगोपन करत रहा. [3]ज्यांचा सांभाळ करावयाचा आहे, त्या
लोकांवर जोर जबरदस्ती करू नका*, परंतु तुम्हीं सर्वांसाठीचा नमूना व्हा. [4]म्हणून जेव्हा प्रधान (प्रमुख) मेंढपाळाचे (राखणारा)
येणे* होईल तेव्हा तुम्हांला असा गौरवी-ताज (शानदार-वैभवी मुगूट*) दिला जाईल, जो कोमेजत नाही*. [5]या रीतिनेच तरुणांनों,
तुम्ही सुद्धा आपल्या पुढाऱ्यांची आज्ञा पाळा*. तुम्ही सगळे जण एकमेकांप्रत दीनतेचा* व नम्रतेचा व्यवहार (आचरण) करा, कारण
हेच की 'परमेश्वर घमेंडी* मनुष्याचा मुकाबला (रोखतो-प्रतिकार) करितो, पण नम्र मनुष्याच्या बाजूने (पक्ष घेऊन) कार्य करितो.'
[6]*म्हणून पराक्रमी परमेश्वराच्या आधीनतेत नम्रतेने जगणे शिका, अशासाठी की योग्य (अचूक) वेळी* त्याने तुम्हांस वृद्धींगत
(उन्नती) करावे. [7]*आपली हरेक (सगळी) चिंता त्याच्यावर टाका*, कारण तोच तुमचे संवर्धन (देखभाल) करितो. [8]स्वतःवर

---

***5:2-4** येथे आपण पाहातो की वडील चर्चला (ग्रीकमध्ये प्रेसब्युटेरोस) संरक्षक म्हणून कार्य करावयाचे आहे - 1 तीम 3:1,ग्रीकमध्ये "एपिसकोपोस" - स्पष्टपणे कळते की पेत्र हे दोन्हीं ग्रीक शब्द 'समानांतर' दृष्टिकोनातून पाहातो आहे. आता वडील चर्चला जे संरक्षक म्हणून कार्य पार पाडावयाचे होते त्यासाठीची कोणती योग्य-पात्रता आवश्यक होती ते 1 तीम 3:1-7व तीताला 1:5-9यांत पाहा. ख्रिस्त प्रधान (मुख्य) मेंढपाळ आहेत. स्थानिक चर्चेसवर (ची) देखरेख व त्यांच्या काळजीविषयीचे व त्यांना राखण्याचे कार्य येशूंनी त्यांच्या सुपूर्द (नियुक्त) केले होते - प्रेषि 20:28. मशीहांनी आपली मेंढरे (विश्वासींना) राखण्याची महत्वाची जबाबदारी त्यांच्यावर टाकलेली आहे, वडील चर्चच्या हवाली हा कार्यभार सोपविल्यामुळे त्यांना त्यांच्या कार्यांविषयीचा हिशेब (उत्तर) येशूंना द्यावा लागणार आहे; त्यांची नियुक्ती याच विशिष्ट कार्यासाठी होत असते, या कारणास्तव त्यांनी काय व कसे, (आपले कार्य) पार पाडले याचे उत्तर त्यांना द्यावे लागणार आहे हे निश्चित. म्हणून प्रत्येक संरक्षकाने ही जबाबदारी अत्याधिक काटेकोरपणे, परमेश्वराच्या मार्गदर्शनात पूर्ण करून जशा प्रकारचे 'मेंढपाळ' त्यांनी व्हावे असे प्रभूला हवे आहे (इच्छा) त्या प्रकारचा 'संरक्षक' व्हावे - तुल, 2:21; यश 56:10-11; यिर्म 3:15; 10:21; 12:10; 23:1-4; यहे 34:2-10.

**"धनलाभ"*- मत्त 6:24; 1 तीम 6:8-10; तीताला 1:7.

**"आनंदाने"*- तीताला 2:14.

***5:3** *"जोर...नका"*- मत्त 20:25-28.

*"नमूना"*- 1 करिं 11:1; फिलि 3:17; 2 थेस्स 3:7; 1 तीम 4:12; तीताला 2:7.

***5:4** *"येणे"*- मत्त 24:30; तीताला 2:13; इब्री 9:28; प्रकटी 22:12.

**"मुगूट"*- फिलि 4:1; 1 थेस्स 2:19; 2 तीम 2:5; 4:8; याकोब 1:12.प्रामाणिक (विश्वासयोग्य) वडीलधाऱ्यांसाठी (पुढारी) अद्भुत पुरस्कारांचा प्रबंध केलेला आहे.

**"कोमेजत नाही"*- 1 करिं 9:25.

***5:5** *"आज्ञा पाळा"*- 2:13,18; 3:1; 1 करिं 16:16; इफि 5:21; याकोब 3:17; 4:7.

**"दीनतेचा"*- नीति 11:2; 15:33; सफन्या 2:3; फिलि 2:3; कल 3:12; तीताला 3:2; याकोब 3:13; मत्त 5:13; 11:29. नम्रतेचा एक गुण (चिन्ह) असा आहे की स्वत:ला काही न समजणे व यासाठीची इच्छा शक्तीही ठेवणे की दुसऱ्यांनी सुद्धा आपल्याला काही विशेष समजू नये. यांतील पहिले तर, सोपे आहे, परंतु, दुसरे नक्कीच जरा अवघड आहे.

**"घमेंडी"*- याकोब 4:6.परमेश्वराने आपला मुकाबला करावा (प्रतिकार) असे आपल्याला हवे आहे (इच्छा) काय? पाहा, परमेश्वराने आपला विरोध करू नये, त्याकरता फक्त एकमात्र मार्ग आहे. घमेंड, आपल्याला परमेश्वरापासून मिळणाऱ्या कृपे-दयेपासून दूर ठेवते, जे तो नम्र व दीनांना देत असतो. हेच विश्वासींनो, जीवनात मिळणाऱ्या अपयशाचे मूळ कारण होय, यामुळेच ख्रिस्ती जीवनांत पराभवाचा सामना करावा लागतो.

***5:6** - याकोब 4:10.

**"योग्य वेळी"*- पुढे तरुणांना संबोधून पेत्र बोलतो आहे (वचन 5). ही योग्य वेळ ती नव्हे जी त्यांना वाटते, परंतु ती जी परमेश्वराने त्याच्या विचारांनुसार योजिलेली आहे. तरुणांनी अस्वस्थ, बेचैन व आपल्याच गोष्टींवर अडून राहण्याचे सोडले पाहिजे, लहानसहान गोष्टींत त्यांनी परेशान होता कामा नये. तर बारीकसारीक गोष्ट का असेना, त्यांत त्यांनी त्यांची विश्वासयोग्यता (विश्वासी असण्याची) सिद्ध करावी - लूक 16:10व परमेश्वरावर विसंबून राहावे व वाट पाहावी की तो 'कोणती गोष्ट नेमकी, कोणत्या ठिकाणी ठेवतो' व त्यासाठी तरुणांनी परमेश्वराला, त्याने स्वत:चा निवडलेला समय व पद्धत यासाठी मार्ग मोकळा करावा - स्तो 75:6-7; 31:15.

***5:7** - स्तो 55:22; मत्त 6:33-34; फिलि 4:6-7.

**"आपली...टाका"*- मत्त 6:30; इब्री 2:6-8; फिलि 4:19. परमेश्वर बापाला आपली काळजी आहे, तो आपल्याबद्दल विचार करतो,

नियंत्रण * (ताबा) ठेवा व सचेत (जागृत) रहा *, कारण तुमचा शत्रु सैतान, गर्जणाऱ्या सिहांसारखा या शोधांत (मोका) असतो, की कोणाला त्याने आपले निशाण करावे. [9] आपल्या विश्वासात मजबूत राहून त्याचा मुकाबला (विरोध) करा * व नीट जाणीव (समजून घ्या) असू द्या की तुमचे इतर भाऊ जे या दुनियेत आहेत, अशीच (हीच) पीडा सहन करत आहेत *. [10] तुमच्या थोडक्या समयाच्या कष्ट-सहनानंतर *, अति-कृपामय परमेश्वर ज्याने तुम्हांला मशीहांत * (ठायी) आपल्या युगानुयुगाच्या महिमेकरिता * बोलाविलेले * आहे, (तो) स्वतःच तुम्हांस सिद्ध- सबळ, बलवान व स्थिर करील. [11] त्याला महिमा व प्रभुता निरंतर (सदैव) मिळो. होय, असेच व्हावे! [12] मी सिल्वानाला विश्वासयोग्य बंधु मानतो, त्याच्या हाताने * थोडके लिहवून घेऊन तुम्हांला समजवलेले आहे व अशी साक्ष दिली आहे की परमेश्वराची सच्ची (खरी) कृपा * हीच आहे. होय, हिच्यात स्थिर (टिकून) रहा. [13] ते जे चर्च * तुमच्यासह निवडलेले

---

आपल्यासाठी सर्व योजना त्याच्या पद्धतीने आखतो, तो आपली चिंता वाहतो, अगदी जसा एक बाप आपल्या मुलांविषयी कळकळीने हरेक गोष्टीचा प्रबंध करतो. भयाकुल व चिंताग्रस्त स्थितीत असणे म्हणजे स्वत:ला पिडणे, दु:ख देणे एवढेच नव्हे, त्याचा अर्थ असाही आहे की परमेश्वराचे विचार, योजना, चिंता (जी आपल्यासाठीची) आहे, त्यावर अविश्वास दाखवून त्याचा अनादर (अपमान) करणे सुद्धा होय. पाहा, त्याच्यावर काळजी टाकून देणे म्हणजे त्या सर्व बाबीं त्याच्याकडे आणणे, विश्वास ठेवणे यासाठी की परमेश्वराला ते सगळे ओझे घेऊन त्याच्या योजनेप्रमाणे, प्रत्येक गोष्ट उत्तम रीतिने साधता यावी. त्यासाठी हे मोठ्या गरजेचे आहे की आपण परमेश्वराच्या चांगुल्यावर, बुद्धीवर व बळावर टेकून निवांत विसावा घ्यावा व त्याला कार्य करू द्यावे.

* **5:8** *"नियंत्रण"*- ग्रीक शब्दानुसार शब्दश: सचेत असणे- परंतु, अलंकारिक भाषेत त्याचा अर्थ, स्वनियंत्रण किंवा आत्मसंयम किंवा जागृत असा होईल - सोप्या शब्दांत कोणत्याही अशा बाहेरच्या गोष्टीचा प्रभाव विश्वासींवर पडता कामा नये जी ख्रिस्ती जीवनाविपरित आहे व येशूंच्या मार्गाच्या प्रतिकूल आहे - 1:13; 4:7; नीति 25:28; गल 5:23; 1 थेस्स 5:6,8; 2 पेत्र 1:6.

* *"सचेत...रहा"*- इफि 6:18; 1 थेस्स 5:6.जे आतंरिक रीतिने गाढ झोपलेले आहेत, त्यांना सैतान सहज जाळयांत ओढतो, खेचतो, जे स्वत:मध्येच मग्न व रमलेले आहेत, अशांना तो निश्चित पकडतोच. 'सैतान' नोट्स - मत्त 4:1.परमेश्वराप्रमाणे तो एकाच समयी, हरेकाकडे, वेगवेगळ्या ठिकाणी असू (हजर) शकत नाही, म्हणून सैतानाला इकडेतिकडे भटकंती (भ्रमण) करावी लागते. मग एखाद्या जागी त्याला शिकार मिळाली की तो त्याला घट्ट बिलगतो; अशाच लोकांच्या शोधात तो सगळीकडे भ्रमण करीत असतो. जरी तो गर्जन करणाऱ्या सिंहासारखा आक्रमण करत असला, तरीही, जे 'येशूंचे विश्वासयोग्य-विश्वासी' आहेत, त्यांचा सामना करताना तो भित्र्यासारखा वागतो, अशा डरपोक शत्रूला 'विश्वसनीय व्यक्ती' सहज आपल्या पायाखाली ठेचून त्याचा चुराडा करू शकतो - याकोब 4:7; स्तो 91:13.

* **5:9** *"मुकाबला करा"*- इफि 6:10-18.विश्वासींनी कोणत्याही प्रकारच्या सैतानी परीक्षांपुढे आणि युक्तींपुढे कधीच गुडघे टेकता कामा नये, कारण त्याची खबर घेण्यासाठी जर त्यांचा दृढ विश्वास 'पर्वताला त्याच्या स्थानावरून बाजूला (हटवू) करणाऱ्या सामर्थी येशूंच्या' प्रचंड बळावर टेकलेला असेल तर ते सैतानाचा धुव्वा उडविण्यास नेहमी समर्थ आहेत - 1 योहान 4:4; 1 करिं 10:13.

* *"अशीच...आहेत"*- पीडा, संकट, छळ व समस्या यांचा सामना करावा लागतो, तेव्हा प्रत्येकाला असेच वाटते की फक्त तोच/तीच ते सहन करतो/करते. प्रियांनो, विश्वासींहो, असे मुळीच नाहीये, कारण केवळ तुम्हीच नव्हे, तर या दुनियेतील असंख्य ख्रिस्ती विश्वासी, ख्रिस्तांच्या नांवामुळे व नांवानिमित्त अशाच परीक्षांचा सामना करत असतात.

* **5:10** *"कष्ट-सहनानंतर"*- 1:6; 4:1,12. अगोदर दु:खसहन व त्यानंतर 'महिमा'; येशू ख्रिस्तांसाठीचा - (1:11); हाच मार्ग होता आणि तोच मार्ग परमेश्वराने प्रत्येक विश्वासीसाठी नेमलेला आहे. पाहा, परमेश्वर त्या सर्वांना काय म्हणतो, जे वेगवेगळ्या परीक्षांतून व छळांतून जात असतात; 'परमेश्वर स्वत:च त्यांना सिद्ध, सबळ, बलवान व स्थिर करेल'- तुल, स्तो 66:12.आपल्या सर्वांना तो या सर्वांतून सुरक्षितपणे बाहेर आणेल व पुर्वीपेक्षा आणखी अधिक सशक्त करेल.

*"अति-कृपामय"*- योहान 1:14,16,17; प्रेषि 15:11; 20:24,32; रोम 1:7; 3:24; 5:21; 2 करिं 8:9; 9:8; इफि 2:8-10.

* *"मशीहांत"*- नोट्स - रोम 6:3-8; इफि 1:1,3.

* *"महिमेकरता"*- योहान 17:24; रोम 5:2; 8:17.

* *"बोलाविलेले"*- 2:9; 3:9; रोम 1:6-7; 8:28-30; 11:29; इफि 4:1; इब्री 3:1; 2 पेत्र 1:10.

* **5:12** *"त्याच्या हाताने"*- तुल, रोम 16:22; 1 करिं 1:1; 2 करिं 1:1; फिलि 1:1; कल 1:1.सिल्वान हा सीलाच आहे - प्रेषि 15:22; 2 करिं 1:19.

* *"परमेश्वराची...कृपा"*- या पत्रात सगळीकडे परमेश्वराच्या कृपेविषयी आपण वाचतो, किंबहुना पत्राचा प्रमुख विषय हाय आहे, असे आढळते - 1:2,10,13; 4:10; 5:5,10. उद्धार फक्त परमेश्वराच्या अनुग्रहामुळेच (कृपा) होत असतो. तीच कृपा होय, जी परमेश्वराच्या लोकांना संकटांतून बाहेर काढेल. याच कृपेमुळे सर्व परीक्षांतून बाहेर येऊन, विश्वासींना सरतेशेवटी महिमा मिळेल.

आहे व बाबेलांत (इराक)[*] आहे, आणि माझा मुलगा मार्क[*] तुम्हांला सलाम सांगतात. [14]प्रेमाने[*] व आदराने संगतिप्रिय-साहाय्यवृत्तीने एकमेकांशी भेटा[*]. तुम्हां सर्वांना, ज्यांनी येशूंचा स्वीकार केला आहे (ग्रहण केलेले आहेच मुळी) शांति[*] असो.

---

[*]**5:13** *"ते जे चर्च"*- लक्ष द्या ते चर्च, जे चर्चला अधिक मिळाले (जुळले) होते.

[*]*"बाबेलांत (इराक)"*- उत्प 10:10; 2 राजे 17:24; यश 13:1.यिर्म अध्याय 50-52. त्या समयी इजिप्तमध्ये (मिसर) बाबेल नांवाचे एक मिलिट्री स्टेशन देखील होते. अनेक टिकाकारांच्या मतें पेत्राचा असाच अर्थ होता. रोम - तुल प्रकटी 17:5,18.लोक मानतात की पेत्राने हे पहिले पत्र तेथूनच लिहिले होते, पण त्याचे काहीही प्रमाण नाहीये. जर त्याने रोममधून हे पत्र लिहिले होते, तर प्रश्न असा उद्भवतो की मग त्याने स्पष्ट स्पष्ट तसे का म्हटले नव्हते?

[*]*"मार्क"*- प्रेषि 12:12,25; कल 4:10; 2 तीम 4:11. पेत्र मार्कास आपला आत्मिक पुत्र (मुलगा) म्हणतो. तुल, 1 तीम 1:2.

[*]**5:14** *"प्रेमाने"*- परमेश्वरी प्रेम - अगापे - 1 करिं 13:1.

[*]*"एकमेकांशी भेटा"*- रोम 16:16; 1 करिं 16:20.

[*]*"शांति"*- लूक 1:79; 2:14; योहान 14:27; रोम 1:7.जे 'ख्रिस्तांठायी' नाहीत, त्यांच्यासाठी सच्ची शांति असू शकत नाहीच मुळी.